सहल थंड प्रदेशाची
। थर्मल । स्वेटर्स । जर्किन
। ग्लोज । सॉक्स । कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड ,अ.नगर
सिंहगड रोड, विमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सीहोर शरबती गहू | सर्व प्रकारचे तांदूळ
सर्व डाळी व कडधान्ये | खडे मसाले
हळद, मिरची, धना पावडर | पोहे, शेंगदाणे, साबुदाना
ड्रायफ्रुट्स | सरबत, क्रश, मॉकटेल
होलसेल रेट मध्ये उपलब्ध !
गरु फुड्स —EXCLUSIVE STORE—
कोहिनूर प्लाझा, पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, सावेडी रोड, अ.नगर
WhatsApp / Call on: 9403738822

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. २९.०४.२०२४ | अंक नं. ०४९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
खरेदीवर ५% कॅशबॅक ऑफर । बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242122

पाईपलाईन फुटून लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया नगर-पुणे महामार्ग सीना नदी पुलावर महानगरपालिकेची पिण्याची पाईप लाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. भर उन्हाळ्यात पेणीटंचाई जाणवत असताना लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया जात असल्याने महापालिकेच्या कारभाराबाबत नागरिक संताप व्यक्त करत आहेत. (छाया - अमित मन्यार)

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा. यासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

ही जाहिरात दाखवा आणि मिळवा स्मॉल मॉकटेल फ्री..फ्री
UFO Juice & Bar
प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
टिप : २००/- रु. किंवा अधिकच्या खरेदीवर ही ऑफर लागू

नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांचे ३ मे रोजी पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषण

नगर - अर्बन बँकेच्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत मिळण्याबरोबरच बँकेवर दरोडा घालणाऱ्या दोषी संचालक आणि कर्जदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई होण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलिसांवर दबाव वाढविण्याच्यादृष्टीने ३ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वा. पर्यंत जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषणास बसण्याचा निर्णय बँक बचाव संघर्ष कृती समितीने घेतला असल्याची माहिती समितीचे डी.एम. कुलकर्णी यांनी दिली आहे.

या संदर्भात कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, बँकेचा नियोजनपूर्वक खून झाल्यानंतर बँक वाचविण्यासाठी बँक बचाव संघर्ष समितीने सातत्याने प्रयत्न केले आहेत. ठेवीदारांच्या बँकेत अडकलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी समितीने सनदशीर मार्गाने लढा दिला आहे. याच तळमळीतून २ मार्च रोजी रास्ता रोको आंदोलन केले. पोलिस व प्रशासनाबरोबरच सातत्याने चर्चा केल्या. ठेवीदारांच्या व्यथा पोटतिडकीने शासनस्तरावर मांडल्या. या लढ्यासाठी वारंवार आवाहन करूनही मोजकेच ठेवीदार प्रत्येक वेळी उपस्थित राहत असल्याबाबत खंत वाटत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

बँक बचाव समिती ठेवीदारांच्या हक्काचा पैसा परत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशिल आहे. सदर पैसे आजारपण, अडचणीच्यावेळी ठेवीदारांना उपलब्ध व्हावा यासाठी समितीची तळमळ आहे. बँक लुटणाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे. यासाठी पोलिस दलावर दबाव ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून शुक्रवारी (दि.३) जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे. ठेवीदारांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. कुलकर्णी यांनी केले आहे.

हाडांची झीज व हाडे ठिसुळ होऊन भुगा होण्यापेक्षा मशिनद्वारे कॅल्शियम तपासणी करा..
कॅल्शियम तपासणी शिबिर
कंबरदुखी, गुडघेदुखी व वात रुग्णांसाठी उपयुक्त
₹1000 ची तपासणी मोफत
कालावधी : २५ एप्रिल ते ३१ मे २०२४, दररोज दुपारी १२ ते ५
डॉ. संदीप सुराणा एम.एस., ऑर्थो, गोल्ड मेडलिस्ट डॉ. अक्षय फिरोदिया डी.एन.बी. मेडिसीन
सिटी केअर - रुबी हॉल क्लिनिक प्रा.लि.
विराज इस्टेट, तारकपुर बस स्टॅण्ड, तारकपुर, अहमदनगर - ४१४ ००१ Ph.No. : 0241-2329105/06/07/08
एक्स-रे रु. 200/- एम.आर.आय. रु. 2100/- 2D ECHO रु. 500/- सिटी स्कॅन रु. 1000/- मल्टिव्हायटील ओझ्झ स्कॅन रु. 5000/-
या शिबीरात ० ई.सी.जी. मोफत ० शुगर मोफत ० रक्त, लघवी तपासणीसाठी ५०% सवलत.
संपर्क : 80555 54155 ० सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध.

शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलाच्या मैदानाची स्वच्छता करा

शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलाच्या मैदानाच्या कडेला कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून मोठे गाजर गवत आलेले आहे. अनेक ठिकाणी काटेरी झुडपे उगवली आहे तसेच पावसाच्या पाण्याच्या नाल्या ही प्लास्टिक, कचरा, मातीने भरल्या आहेत. प्रेक्षक गॅलरीवरही मोठ्या प्रमाणावर धूळ साचली आहे. प्रेक्षक गॅलरीमधील स्वच्छतागृहामध्ये अस्वच्छता असते. तसेच सायंकाळी मैदानावर तसेच मैदानाबाहेरही प्रकाशाची व्यवस्था अपुरी आहे. काही आऊटपोस्टच्या भागामध्ये अतिक्रमण ही झालेले आहे. या समस्या निवारण करून स्टेडियम आंतरराष्ट्रीय दर्जाचे करावे अशी मागणी येथे क्रीडाप्रेमींनी केली आहे. (छाया - महावीर पोखरणा)

हातात तलवार घेवून गांधी मैदान परिसरात दहशत

युवकाला पोलिसांनी पकडले; तलवार जप्त करत गुन्हा केला दाखल

नगर - शहरातील चित्रा टॉकिज ते गांधी मैदान रस्त्यावर हातात धारदार तलवार घेवून आरडाओरडा, शिवीगाळ करत दहशत करणाऱ्या युवकाला कोतवाली पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. त्याच्या कडून तलवार जप्त करत त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

गणेश रामदास बुलाखे (वय २२, रा. दिनेश हॉटेल पाठीमागे, कल्याण रोड) असे या युवकाचे नाव आहे. गणेश बुलाखे हा रविवारी (दि.२८) रात्री ८.२० च्या सुमारास चित्रा टॉकिज ते गांधी मैदान रस्त्यावर हातात धारदार तलवार घेवून आरडाओरडा, शिवीगाळ करत तसेच आवेशपूर्ण हावभाव करत फिरत होता. त्यामुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती.

कोणीतरी कोतवाली पोलिसांना याबाबत माहिती दिली. ही माहिती मिळताच कोतवाली पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी शिताफीने गणेश बुलाखे याला झडप घालून पकडले. त्याच्या हातातून तलवार काढून घेत त्यास पोलिस ठाण्यात नेवून अटक केली. त्याच्या विरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोन्या-चांदीच्या दरात आठवड्याच्या पहिल्याच दिवशी घसरण

नवी दिल्ली - मागील दोन महिन्यात झपाट्याने वाढलेल्या सोने आणि चांदीच्या किंमती आता खाली घसरत आहेत. नव्या वर्षाच्या सुरुवातीपासून सोने आणि चांदीत चढउताराचे सत्र पाहायला मिळाले असून गेल्या दोन महिन्यातील दरवाढीचे खरेदी करणाऱ्यांना धाम फोडला. दोन्ही धातूंनी आतापर्यंतचे भाववाढीचे सर्व रेकॉर्ड इतिहासजमा केले असून सोने-चांदीची घौडदौड सुरु असताना गेल्या आठवड्यात तुफान दरवाढीत ब्रेक लागला तर नव्या आठवड्याची सुरुवातही घसरणीच्या झाली आहे.

येत्या काळात दर आणखी कमी होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे अक्षय्य तृतीयेच्या आधी सोन्याचे भाव कमी होत असून चांदीची किंमतही स्वस्त होत आहे. सोमवारी, आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी सोन्याच्या भावात ३०० रुपयांची घसरण नोंदवली गेली आहे.

मल्टी कमोडिटी एक्सचेंज वर सोमवारी जून सोन्याचा वायदा २२९ रुपयांनी कमी होऊन ७१,२७१ रुपये प्रति १० ग्रॅमवर दिसून आला असून सकाळपासूनच सोन्याचा भाव घसरत आहे. तसेच ऑगस्ट सोन्याचा वायदाही ९९४ रुपयांनी स्वस्त होऊन ७१,३३० रुपये प्रति १० ग्रॅमवर घसरला आहे. दुसरीकडे, सोन्याप्रमाणेच चांदीचे फ्युचर्सही स्वस्त झाले आहेत. चांदीचा मे वायदा प्रतिकिलो ८०,६६८ रुपयानावर व्यापार करत असताना जुलै चांदीचे फ्युचर्स ८२,४७२ रुपये तर चांदीचा सप्टेंबर वायदा ८३,८१९ रुपये प्रति किलो झाला आहे.

।।श्री आनंद गुरुवे नमः।।
।। श्री महावीराय नमः ।।
मंगल आगमन

आचार्य भगवंत राष्ट्रसंत पूज्य
श्री आनंदऋषीजी म.सा. के सुशिष्य
अर्हम विज्ञा प्रणेता
उपाध्याय प्रवर
श्री प्रवीणऋषिजी म.सा.
आदि ठाणा २
२ से ४ मई २०२४
स्थान
आनंद धाम,अ.नगर
One Voice

DISHA COMPUTER INSTITUTE
MAHA DiSCOUNT
Just in 1800 Any Course
MAHA DiSCOUNT
FEATURES OF DISHA E-LEARNING APP
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME
PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR
INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
JOIN TODAY
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

पुस्तक चोर – मूळ लेखक मार्कस् झुसॅक

उन्हाळ्याच्या सुट्टयाा आहेत. निवडणुका, आयपीएलचा धुरळा असला तरी कॉलेज मित्रांना, विद्यार्थी, शिक्षक व गृहिणींनी सुद्धा शक्य तेवढे वाचन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

पुस्तक चोर ही मूळ कादंबरी अनेक अर्थांनी ग्रेट. अद्वितीय! या पुस्तकात आणखी दोन–तीन अख्खी पुस्तके दडलेली आहेत तसेच एक–दोन वेगळे लेखकही! या कादंबरीतील कथानकाचा निवेदक, सूत्रधार आहे मृत्यू.

हे पुस्तक पाचशेपेक्षा अधिक पानांचे असले तरी आपल्याला पाहिजे ते छोटे छोटे मुद्दे २/३ पानांतला आशय मनाला आनंद देतात...बॅनडाच्यित विद्युल्लेखा अकलूजकर म्हणतात की, पुस्तकचोर ही कादंबरी जीवनाच्या जवळ जवळ प्रत्येक अंगाला स्पर्शून जाते म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. जीवन आणि मरण या टोकांमधील प्रेम व द्वेष, भयमिश्री आणि आनंद, दुःख आणि नियतीने दिलेल्या भोगाचा निमूट स्वीकार, या भावभावनांच्या सर्व छटा त्यातून आपल्या भेटीला येतात. या पुस्तकात हिटलरच्या विचारांमुळे झालेल्या जर्मन कुटुंबाची सरसोहोलपट दिसते. आम्हा मराठी वाचकाला पुष्कळसे अपरिचित असे वास्तव अनुवादित करण्यात लेखिका यशस्वी झाल्यात. यंदाच्या सुट्टीत काहीतरी वाचाच.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"–९८२२०२०६९१



यवतमाळ येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली. त्याचा नगर शहर ओबीसी समाजाच्यावतीने माळीवाडा येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास जलाभिषेक करून निषेध व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी अनिल निकम, अनुरिता झगडे, सुरेश आंबेकर, नितीन मुतारे, राजेंद्र पडोळे, भाऊसाहेब कोल्हे, जवाहरलाल पोखरणा, अनिल इवळे, प्रकाश इवळे, नारायण इवळे, बाबासाहेब साठे, गणेश कोल्हे, लवेश गोंधळे, मच्छिंद्र बनकर, बजरंग भुतारे, बाळू चत्तर, सुधाकर कानडे, जालिंदर बोरुडे आदि.

महात्मा फुले पुतळ्यास जलाभिषेक करुन यवतमाळ येथील घटनेचा नगरमध्ये निषेध

अपप्रवृत्तीकडून समाजा–समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न : अनिल निकम

नगर – आज समाजात नितीमुल्य राहिलेली नाहीत, ज्या राष्ट्र पुरुषांनी समाजाच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य वेचले, अनेक आघात सहन करुन एक सक्षम समाज निर्मिती केली. परंतु आजही समाजात अपप्रवृत्ती बाकी आहे, या अपप्रवृत्तीकडून समाजा–समाजात तेढ निर्माण होतील असे कृत्य केले जात आहे. यवतमाळ येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची झालेली विटंबना निषेधार्थ आहे. या घटनेमागे असलेल्यांना तातडीने शोधून अटक करुन कडक शासन करावे. जेणे करुन यापुढे अशी कृती पुन्हा होणार नाही. शासनाने यावर तातडीने पाऊले उचलावीत, अन्यथा ओबीसी समाज रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा अनिल निकम यांनी दिला.

यवतमाळ येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली. त्याचा नगर शहर ओबीसी समाजाच्यावतीने माळीवाडा येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास जलाभिषेक करुन निषेध व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी अनिल निकम, अनुरिता झगडे, सुरेश आंबेकर, नितीन मुतारे, राजेंद्र पडोळे, भाऊसाहेब कोल्हे, जवाहरलाल पोखरणा, अनिल इवळे, प्रकाश इवळे, नारायण इवळे, बाबासाहेब साठे, गणेश कोल्हे, लवेश गोंधळे, मच्छिंद्र बनकर, बजरंग भुतारे, बाळू चत्तर, सुधाकर कानडे, जालिंदर बोरुडे आदि उपस्थित होते.

यावेळी अनुरिता झगडे म्हणाल्या, महात्मा फुले हे सर्वच समाजाचे आदरस्थान आहे, स्त्री शिक्षण, समाज सुधारण बाबत त्यांचे मोठे कार्य आहे. त्यांच्या कार्याचे प्रेरणा ही आपल्याला पुतळे, प्रतिमेतून मिळत असते. परंतु समाजातील विघातवृत्ती या पुतळ्यांना टार्गेट करुन समाजात दुजाभाव निर्माण करत आहेत, हे कृत्य निषेधार्ह असेच आहे. परंतु महात्मा फुले यांचे जनसमान्यच्या मनातील विचार पुसू शकत नाही. नगरमधील ओबीसी समाजाच्यावतीने माळीवाडा येथील पुतळ्यास जलाभिषेक घालून शुद्धीकरण करण्यात येऊन यवतमाळ घटनेचा निषेध केला असल्याचे सांगितले.

पद्माबाई रांदड यांचे वृद्धापकळाने निधन

नगर – आंबेजोगाई येथील रहिवासी श्रीमती पद्माबाई श्रीनिवास रांदड (वय ९०) यांचे २८ एप्रिल रोजी वृद्धापकळाने निधन झाले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रमेशचंद्र आसावा यांच्या त्या मातोश्री होत.

हद्दपार आदेशाचा भंग करणाऱ्याला नगरमध्ये पकडले

नगर – नगर शहरासह जिल्ह्यातून १ वर्षासाठी हद्दपार केलेले असतानाही त्या आदेशाचा भंग करुन शहरात वास्तव्य करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. कुणाल महेंद्र पोटे (वय ३२, रा. प्रेमदान हडको,नगर) असे या आरोपीचे नाव आहे.

कुणाल पोटे याला नगरच्या प्रांताधिकारी यांनी १ वर्षासाठी नगर जिल्ह्यातून हद्दपार केलेले आहे. असे असतानाही तो लपून छपून नगर शहरात फिरत असून त्याच्या राहत्या घरी वास्तव्यास असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. ही माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याच्यावर लक्ष ठेवले. तो रविवारी (दि.२८) त्याच्या घरी असल्याची माहिती मिळताच त्याला घरात पकडण्यात आले. त्याच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात हद्दपारी आदेशाचा भंग केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यात सत्ताधाऱ्यांकडून ओबीसींची 'मुस्कटदाबी'

ओबीसी नेते, उमेदवारांना 'टार्गेट' केले जात आहे, त्या फलकावरील कारवाई हा अन्यायच

नगर – 'ओबीसींनी ओबीसींना सहकार्य करा' अशा आशयाचे फलक लावणे काहीही चुकीचे नाही. असे फलक लावण्यास प्रशासकीय अधिकाऱ्यांनीच परवानगी दिलेली होती. आधी परवानगी देता, नंतर ती रद्द करता, नोटीस न देताच गुन्हे दाखल करता, हा अन्याय नाही तर काय आहे? असा सवाल करत सत्तेचा गैरवापर करत सत्ताधाऱ्यांकडून ओबीसी मुस्कटदाबी सुरु असल्याचा आरोप नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील उमेदवार दिलीपराव खेडेकर यांनी केला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना ओबीसींचे नेते.

नगर शहरासह परिसरात मागील चार–पाच दिवसांपूर्वी 'ओबीसींनी ओबीसींना सहकार्य करावे', असे फलक झळकले होते. या फलकामुळे निवडणुक आचारसंहिता भंग होत असल्याचे कारण देत महापालिका उपायुक्तांनी या फलकाला (होर्डिंग) दिलेली परवानगी पुन्हा रद्द केली. त्यानंतर नगर रचनाकार यांच्या फिर्यादीवरुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या संदर्भात उमेदवार दिलीपराव खेडकर यांच्यासह ओबीसी चळवळीतील राजेंद्र पडोळे, वामनराव भदे, साहेबराव रासकर, लक्ष्मण कोथिंबीरे आदींनी सोमवारी (दि.२९) पत्रकार परिषदेत भूमिका मांडली.

ओबीसीसंदर्भात लागलेले फलक हे प्रचारासाठी नव्हते तर ओबीसी समाज एकत्र व्हावा यासाठी होते. ओबीसी ही जात नाही तर संवर्ग आहे. या समाजात सलोखा निर्माण होण्यासाठी असे फलक लावले तर बिघडले कुठे? प्रशासनाची पितसर परवानगी घेऊन हे फलक लावले होते. त्यामुळे त्यात गैर वाटत नाही. परंतु आज जातीय तेढ निर्माण केली जात आहे. ओबीसी नेत्यांना आणि उमेदवारांना 'टार्गेट' केले जात आहे. त्यांना गावा–गावातून हाकलून दिले जात आहे. तसे ठराव घेतले जात आहे. बीडच्या उमेदवार पंकजा मुंडे, प्रकाश शेंडगे, महादेव जानकर असे अनेक ओबीसी उमेदवार आणि नेत्यांना त्रास दिला जात आहे. अशा प्रकारचा मी निषेध करतो, असे खेडकर म्हणाले.

आज प्रत्येकास निवडणूक लढण्याचा, प्रचार करण्याचा अधिकार आहे. परंतु ओबीसींवर सध्या मोठा अन्याय सुरु आहे. ओबीसींविरोधात जातीवादक बोलले जाते, घोषणाबाजी केली जाते परंतु त्यांच्यावर गुन्हे दाखल होत नाहीत. ओबीसींना उमेदवारीही डावलली जाते. स्वतःचा मतदारसंघ कमी पडला म्हणून दुसऱ्या मतदारसंघातून उमेदवारी करायची, आम्ही का थांबायचे, किती दिवस तुमच्या सतरंज्या उचलायच्या, आता ओबीसी अन्यायाविरोधात लढणार असल्याचे खेडकर म्हणाले.

ओबीसी विरोधात महाराष्ट्रात षड्.यंत्र

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात ओबीसींविरोधात षड्.यंत्र रचले जात आहे. ओबीसींना दडपण्याचे काम चालू आहे. आपल्या विरोधात वातावरण तयार होते की काय, या भावनेने षड्.यंत्र रचले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून ओबीसींच्या फलकावर केलेल्या कारवाईकडे पहावे लागेल. मनोज जरांगे पाटील ओबीसी समाजाविरोधात बोलतात. सामाजिक वातावरण दूषित करत आहेत, परंतु त्यांच्यावर कारवाई होत नाही. येथे मात्र केवळ समाज एक व्हावा, यासाठी लावलेले फलक आधी परवानगी देऊन नंतर ती रद्द करुन हटविले जात आहेत. प्रशासनाने दुजाभाव न करता सर्वांवर कारवाई करावी. जरांगे पाटील जातीय तेढ निर्माण करत असल्याबाबत लवकरच यंत्रणेकडे तक्रार करणार असल्याचे उपस्थित ओबीसी नेत्यांनी यावेळी सांगितले.

बाबालाल पितळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील पुनम मोतीनगर, नवजीवन कॉलनीत राहणारे बाबालाल (उर्फ विरेंद्र) झुंबरलाल पितळे (वय ८०) यांचे २८ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वा. दीर्घ आजाराने निधन झाले. संध्याकाळी नालेगाव अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ भाऊ, भाऊजय, १ मुलगा विशाल, ४ विवाहित मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विशाल पितळे यांचे ते वडील होत. नगरच्या साईदीप ग्रुपचे उद्योगपती निलेश चोपडा यांचे ते सासरे होते.

श्रीनिवास बंग यांचे हृदयविकाराने निधन

नगर – येथील पाईपलाईन रोड भागातील प्रिन्स कॉलनीत राहणारे श्रीनिवास रामकिसन बंग (वय ६७) यांचे २८ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर २९ रोजी नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ भाऊ, सुन असा परिवार आहे. आनंद बंग यांचे ते वडील तर स्व. गोपाळ तथा राजेंद्र बंग यांचे ते बंधू होत.

जयश्री कलवडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील सावेडीच्या पाईपलाईन रोड भागात राहणाऱ्या जयश्री किरण कलवडे (वय ६७) यांचे २१ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. के. डॉ. किरण कलवडे यांच्या त्या पत्नी व चैतन्य कलवडे यांच्या त्या मातोश्री होत.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

नगरमध्ये सेल्समनची बॅग चोरणारे दोघे पुण्यात पकडले

चोरीचा ४८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी केला हस्तगत

नगर – गोडझे फिलीप्स इंडिया लिमिटेल या कंपनीमध्ये सेल्समन म्हणुन काम करणाऱ्या नगरमधील सेल्समनची विविध सिगारेटचे बॉक्स असलेली बॅग चोरुन नेणाऱ्या दोघा चोरटयांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पिंपरी, पुणे येथुन ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून ८ हजारांची रोकड व ४० हजार रुपये किमतीचे विविध सिगारेटचे बॉक्स असलेली बॅग असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सेल्समन मिराज मुमताज शेख (रा. मुकुंदनगर) हे २२ एप्रिलला नगर येथुन सुपा परिसरामध्ये सिगारेट विक्रीकरीता गेले होते. त्यांनी त्यांचेकडे असलेली सिगारेटची बॅग मोपेड मोटारसायकलवर ठेवुन सुपा येथील साई श्रध्दा किराणा स्टोअर्स या दुकानामध्ये गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयांनी १ लाख ९ हजार ७०४ रुपये किमतीचे सिगारेट व रोख रक्कम असलेली बॅग चोरुन नेली होती. या बाबत सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलीस अंमलदार भाऊसाहेब काळे, दत्तात्रय हिंगडे, मनोहर गोसावी, रविंद्र कर्डीले, अमृत आढाव, सागर ससाणे, फुरकान शेख, मेघराज कोल्हे, संतोष खैरे, संभाजी कोतकर यांचे पथक तयार करुन तपासासाठी रवाना केले होते. या पथकाने सुपा परिसरामध्ये जावुन घटना ठिकाणीचे तसेच आजुबाजुचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता पथकास ४ इसम सिगारेटचे बॉक्स असलेली बॅग घेवून पुणेकडे जातांना दिसले.

नगरमधील सेल्समनची बॅग चोरणाऱ्या दोघांना पुण्यातून पकडून आणल्या नंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

सदर फुटेजमधील संशयीत इसमांची माहिती घेत असतांना फुटेजमधील एक इसम हा आकाश भवरसिंह राजपुत (रा. पुणे) असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीची माहिती काढत असतांना तो त्याचे साथीदारास त्यांचे राहते घरी आला असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पथकाने पुणे येथे जावुन आरोपी आकाश उर्फ बंटी भवरसिंह राजपुत (वय – २१, रा. विद्यानगर झोपडपट्टी मस्जिदजवळ, पिंपरी, पुणे) व रोहित मदन कुर्मी (वय – २४) यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे सदर गुन्ह्याबाबत विचारपुस करता त्यांनी विशाल उर्फ बारक्या अनिल नलवडे (रा. रामनगर, पिंपरी चिंचवड, पुणे), रोहित छोटु भोसले (रा. रामनगर, पिंपरी चिंचवड, पुणे) यांचेसोबत गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. ते दोघे फरार आहेत.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीकडुन ८ हजारांची रोकड व ४० हजार ४०० रुपये किमतीचे सिगारेटचे बॉक्स असलेली बॅग असा एकुण ४८ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सारोळाबद्धीचे जुन्या पिढीतील शेतकरी सयाजी डहाणे यांचे वृद्धापकळाने निधन

नगर –जामखेड रोड वरील सारोळाबद्धी (ता.नगर) येथील जुन्या पिढीतील शेतकरी सयाजी दाहाणा डहाणे (वय ८४) यांचे २८ एप्रिल रोजी सकाळी नगर मधील लक्ष्मीकारंजा जवळील घरी वृद्धापकळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ एप्रिल रोजी सायंकाळी सारोळाबद्धी गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील लोक उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात बाळू डहाणे हा मुलगा, पत्नी द्रौपदी, राजू नारायण डहाणे हा पुतण्या, संगीता बबन कांबळे, मनिषा राजू सूर्यवंशी, सविता लक्ष्मण शिरसाठ या ३ मुली, जावई, सुन, सचिन शिरसाठ, अमोल डहाणे, लक्ष्मण साठे, सचिन व संजय कांबळे हे नातू असा परिवार आहे.

कारची दोन मोटारसायकलला धडक; एकाचा मृत्यू, १ जखमी

नगर – पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या कारने पुढे चाललेल्या २ मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने एक मोटारसायकल वरील युवकाचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या मोटारसायकल वरील युवक बालंबाल बचावला असून जखमी झाला आहे. नगर सोलापूर महामार्गावर वाटेफळ (ता.नगर) गावच्या शिवारात शनिवारी (दि.२७) रात्री हा अपघात झाला.

सुयश प्रताप पांडूळे (वय २२, रा. पिंपरी घुमरी, ता.आष्टी, जि.बीड) असे मयत युवकाचे नाव असून जयदीप दत्तात्रय पांडूळे (वय २१, रा. पिंपरी घुमरी, ता.आष्टी, जि.बीड) हा युवक जखमी झाला आहे. त्याने नगर तालुका पोलिस ठाण्यात याबाबत फिर्यादि दिली आहे. मयत व जखमी हे दोघे दोन मोटारसायकल वर नगरहून सोलापूर महामार्गाने त्यांच्या गावाकडे चाललेले होते. वाटेफळ (ता.नगर) गावच्या शिवारात विश्वशांती हॉटेलजवळ पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या रेनोल्ट कंपनीच्या डस्टर कारने (क्र. एम एच १६ बी एच ०१०७) त्यांच्या दोन्ही दुचाकींना जोराची धडक दिली. या धडकेत सुयश प्रताप पांडूळे हा गंभीर जखमी होऊन मयत झाला तर जयदीप दत्तात्रय पांडूळे हा सुदैवाने बालंबाल बचावला असून तो रस्त्याच्या बाजूला पडून जखमी झाला आहे. अपघाताल दोन्ही मोटारसायकल तसेच कारचेही मोठे नुकसान झाले असून कार चालक अपघातानंतर कार तेथेच सोडून पसार झाला. याबाबत जयदीप पांडूळे याने दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी कार चालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

धक्काबुक्की करून महिलेचे गंठण हिसकावून पळविले

सिव्हिल हडको परिसरातील घटना; प्रतिकामुळे चोरटा दुचाकी सोडून पळाला

नगर – महिलेला धक्काबुक्की करुन त्यांच्या गळ्यातील १६ ग्रॅमचे मिनी गंठण ओरबाडून नेल्याची घटना रविवारी (दि. २८) सकाळी साडेआठच्या सुमारास सिव्हिल हाडको मधील काशिद हॉस्पिटलच्या पाठीमागील बाजूला घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लता शेकडे (वय ३३ रा. दत्त मंदिराशेजारी, बालिकाश्रम रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. त्या रविवारी सकाळी बागल हॉस्टिलमधील कामकाज आटोपून त्यांच्या दुचाकीवर व त्यांची मैत्रिण तिच्या दुचाकीवरुन घरी जात असताना साडेआठच्या सुमारास सिव्हिल हाडकोमधील काशीद हॉस्पिटलच्या पाठीमागील बाजूस पाठीमागून एक व्यक्ती दुचाकीवर आला व त्याने अचानक लता यांच्या गळ्यातील मिनी गंठण बळजबरीने ओरबाडले. तो गंठण तोडून व घेऊन जात असताना लता व त्यांच्या मैत्रिणीने त्याच्या दुचाकीचे हँडल पकडून ठेवले असता तो खाली कोसळला. लता यांनी त्याच्याकडे गंठणची मागणी केली असता त्याने धक्काबुक्की केली. दुचाकी जागेवर सोडून तेथून पळ काढला. लता यांनी घटनेची माहिती फोनवरुन तोफखाना पोलिसांना दिली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी दुचाकी पोलीस ठाण्यात आणली. लता यांच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्यावरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल केला आहे.

चोरीची घटना सीसीटीव्हीत केद

सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर वर्दळ कमी होती. त्याचवेळी संधी साधून सोनसाखळी चोरट्याने दुचाकीवरुन जाणाऱ्या लता शेकडे यांना गाठून त्यांच्या गळ्यातील गंठण ओरबाडले. परंतु लता यांनी मैत्रिणीच्या मदतीने धाडस दाखवून चोरट्याची दुचाकी पकडली. त्याच्याकडे गंठणची मागणी करताच त्याने धक्काबुक्की केली. तरीही लता व त्यांच्या मैत्रिणीने हार पत्करली नाही. शेवटी तो चोरटा दुचाकी सोडून गंठण घेऊन पळाला. पोलिसांनी दुचाकी ताब्यात घेतली असून ती चोरीची असल्याचा संशय आहे. घटना सीसीटीव्हीत केद झाली आहे.

व्यवसायाच्या कारणातून कोठल्यात युवकावर कुऱ्हाड, चॉपरने वार करून झाडल्या गोळ्या; गुन्हा दाखल

नगर – ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करणाऱ्या युवकावर कुऱ्हाड, चॉपरने वार करुन गोळीबार केल्याची घटना शनिवारी (दि.२७) मध्यराञी कोठला भागात घडली. सरवर अस्लम शेख (वय ३३, सुमेदार गल्ली, नगर) असे जखमी युवकाचे नाव आहे. त्याने उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन तोफखाना पोलिस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन दिवसांपूर्वी माळीवाडा बसस्थानक परिसरात प्रवासी भाड्यावरुन किरकोळ वाद झाला होते. त्यानंतर शनिवारी मध्यराञी १२ वाजण्याच्या सुमारास सरवर व त्याचा मित्र सादीक शेख शफी हे कोठला येथील बाकड्यावर बसलेले असताना दानिश उर्फ धन्या याने सरवर याच्यावर कुऱ्हाडीने वार केला. त्यानंतर राहील यानेही कुऱ्हाडीने वार केला. सरवर हा तेथून पळून जात असताना उफेर उर्फ लाला व गणेश पोटे उर्फ टिंग्याने चॉपरने वार केल. तर तालीब (पूर्ण नाव माहीत नाही) याने दगड फेकून मारला. त्यानंतर धन्या उर्फ दानिश याने बंदुकीने सरवर याच्यावर गोळ्या झाडल्या. यावेळी गोळ्या चुकल्या नको माई, मेंबरची बोले वैसा कर, असे साहिल याने धन्या याला संगितल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

तोफखाना पोलिसांनी याचही जणांवर खुनाचा प्रयत्न, आर्म क्ट व इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. ऐन निवडणुकीच्या काळात झालेल्या गोळीबार प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, आरोपींपैकी काही जणांवर यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत. अधिक तपास तोफखाना पोलिस करत आहेत.

गृहिणी

आरोग्य

निरोगी गरोदरपण

गरोदरपण ही स्त्रीच्या जीवनातील एक फार महत्त्वाची अवस्था आहे. गरोदरपणात व्यवस्थित काळजी घेतल्यास आई व मूल या दोघांचे आरोग्य सांभाळले जाते. गरोदरपणात काळजी घेण्याची प्रमुख उद्दिष्टे : आईला त्रास न होता गरोदरपण व बाळंतपण पार पाडणे. या काळात निरनिराळे आजार येऊ शकतात व आधी असलेले काही आजार बळावतात. हे आजार वेळीच ओळखून योग्य उपचार करणे, तसेच बाळंतपणातले धोके टाळून बाळंतपण शक्य तितके निर्धोक करणे. गरोदरपण, बाळाचे संगोपन आदी आवश्यक ती माहिती देऊन त्या दृष्टीने आईची तयारी करावयास हवी. जन्मणारे बाळ चांगल्या वजनाचे, अव्यंग व निरोगी असावे म्हणून काळजी घ्यावी.

पाककला

स्पायर्स बेक्ड पोटॅटो

साहित्य – ४ उकडलेले बटाटे, २ वाट्या वाफवलेले मटार, १ कांदा, १ टोमॅटो, थोडी कोथिंबीर बारीक चिरून, आले–लसूण पेस्ट, ५० ग्रॅम लोणी, अर्धी वाटी दूध, १ चमचा हिरव्या मिरचीची पेस्ट, ६ ब्रेड स्लाइसचा चुरा, एक चमचा जिरे–मिरे, गरम मसाला व मीठ.

कृती – बटाटे उकडून, सोलून, कुस्करून घ्यावेत. त्यात दूध आणि लोणी फेटून घ्यावे. जिरे–मिरे भरड वाटून त्यात मिसळावे. मीठ घालावे. ब्रेडचा अर्धा चुरा मिसळावा. थोडक्या तेलावर कांदा, मिरची टोमॅटो परतून घ्यावे. त्यात आले–लसूण पेस्ट, कोथिंबीर, मीठ, साखर, चिमूटभर गरम मसाला घालावा. मटार घालून मिसळून खाली उतरवावे. आता बेकिंग डिशला लोणी लावावे. त्यात बटाट्याचा अर्धा गोल थापावा. वरून उरलेला ब्रेडचा चुरा पसरावा. थोडे लोणी घालून आणि ओव्हनमध्ये १६० अंश वर वीस मिनिटे भाजावे.

वास्तू

घरातील दोष करा नाहिसे

घरात सकाळी खिडक्या उघडून ठेवाव्यात. उत्तर–पूर्व दिशेच्या खिडक्या, दारे येथून सूर्यप्रकाश आल्यास घरातील दोष तसेच आजारपण दूर होतात.

सौंदर्य

टोमॅटो आपल्या चेहऱ्यावरील मुरुम घालवण्यासाठी उत्तम औषध आहे. २०० ग्रॅम टोमॅटो व ओल्या हळदीचा रस नियमित तीन महिने चेहऱ्यावर लावल्यास मुरुम नाहीसे होतात व चेहरा सतेज होतो.

सल्ला

पोटदुखी– ओवा व साखर गरम पाण्याबरोबर घेण्याने पोटदुखी कमी होते. लहान बाळांमधील पोटदुखी पोट शेकण्यानेही कमी होते. अगदी तान्हे बाळ असेल तर आईने ओवा चावून बाळाच्या बेंबीवर तोंडानेच वाफारा सोडला तरी पोटदुखी कमी होते. मात्र, गॅससेमुळे बाळाचे पोट दुखत असेल तर हिंग पाण्यात कालवून त्याचा लेप बेंबीभोवती दिल्याने आराम पडतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३० एप्रिल २०२४

----, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, उ.षा.२८।०९

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य–

मेष : आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. इतरांना सहकार्य केल्याने वाद उद्‌भवू शकतात. आपले काम धाडसाने करा. राहते घर व जमिनीसंबंधीच्या कामात स्थिती अनुकूल राहील.

वृषभ : एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. नवीन योजनांच्या बाबतीत स्थिती लाभदायक राहील. आरोग्य उत्तम राहील.

मिथुन : अनुकूललेमुळे मन प्रसन्न राहील. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील. प्रवासाचे योग संभवतात. घरात किंवा कुटुंबात शुभप्रसंग घडतील.

कर्क : संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. व्यापार–व्यवसायात वातावरण अनुकूल मिळेल.

सिंह : आरोग्याची व खाण्या–पिण्याची काळजी घ्या. आर्थिक नुकसानाची शक्यता आहे. आरोग्य उत्तम राहील. आपली कामे धाडसाने करा. राजकीय व्यक्तींना काळ अनुकूल आहे.

कन्या : नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. व्यापार व्यवसायात सावधगिरी बाळगा. लांबचे प्रवास टाळा. आनंदाची बातमी मिळेल.

तूळ : अपेक्षेनुसार कार्ये होतील. आरोग्य उत्तम राहील. मित्रांपासून, सहकाऱ्यांपासून लाभ मिळेल. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखद.

वृश्चिक : व्यापार–व्यवसायात स्थिती सुखद राहील. इच्छित कार्य थोडया उशीरा होतील. कामात पूर्ण समर्पणभाव ठेवा. अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील.

धनु : अनपेक्षित खर्च होण्याची शक्यता. महत्वाच्या व्यक्तींशी संपर्क येईल. सामाजिक स्थितीत सुधारणा होईल. पण खाण्या–पिण्याच्या बाबतीत काळजी घ्या.

मकर : अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील.

कुंभ : नवीन कामे, योजना लाभदायक ठरतील. अडकलेले कामे आपल्या प्रयत्नांमुळे पूर्ण होतील. आरोग्य नरम–गरम राहील. अपेक्षित व्यक्तींचे सहकार्य मिळेल.

मीन : महत्त्वाच्या कामांमध्ये आपणास घरच्यांचा पाठींबा मिळेल. आपण ठरावीक वेळेत काम पूर्ण कराल. कौटुंबिक जीवन आपल्यासाठी आनंद आणेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९१३ सौ. शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ६९१३ चे उत्तर

आडवे शब्द :– १) दिनकर; दिवाकर; रवि; सूर्य ३) जंगलाला लागलेली आग; वणवा ५) विश्व; दुनिया; जग ७) स्त्रियांचे एक वस्त्र ९) गव्हाचे पीठ ११) नजीक; समीप १३) पुढे वाकलेला; आडवा १५) कृष्णाने गोपींबरोबर केलेली क्रीडा १७) मनुष्य; मानव १८) जनावरांचे एक खाद्य; तण; तृण १९) सुवर्ण; कांचन; सोने २०) मातीची दिवली जी दिवाळीत हमखास लावली जाते

उभे शब्द :– १) भारतातील एक मोठा राजकीय पक्ष २) धोबी; परीट ३) चावण्याचा अवयव; दंत ४) अंधोळ करण्याची जागा; स्नानगृह ६) आवश्यकता; नड ८) उपभोक्ता; पती ९) मंदिर वगैरेचा सर्वोच्च भाग; शिखर १०) संपूर्ण अंगभर एकाच रंगाची किंवा पिंगट रंगाची गाय १२) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक १३) तेज; प्रभा १४) वर्तन; चारित्र्य; चाल १६) भास्कराचार्यांचा गणितावरील प्रसिद्ध ग्रंथ १७) गळ्याची मागची बाजू १८) भक्त किंवा सेवक यांचा समूह

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : जे दुसऱ्याचे भले करतात, त्यांचे खुद्द परमेश्वरच भले करतो. **– धम्मपद.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

टॉवर ऑफ सायलेन्स म्हणजे काय?

माणूस मेल्यानंतर त्याचे काय करायचे, हे त्याच्या धर्मानुसार वा मृत्यूपूर्वी त्याने काही इच्छा (उदा. देहदान) लिहून ठेवली असेल तर त्यावर ठरते. हिंदूंमध्ये मृतदेहाला अग्नी देतात. मुस्लीम आणि ख्रिश्चन लोक मात्र मृतदेह पुरतात. मृतदेहाला अग्नी देण्यासाठी पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणे लाकडांचा वापर करून चिता तयार केली जाते. आजकाल विद्युतदाहिन्यांमध्येही मृतदेहाला अग्नी देतात. अर्थात ही सोय फक्त मोठ्या शहरांमध्येच उपलब्ध आहे.

तुम्हाला वाटेल, ही काय भलतीच चर्चा सुरू केली आहे! पण 'टॉवर ऑफ सायलेन्स' म्हणजे काय, हे सांगण्यासाठी ही पार्श्वभूमी आवश्यक आहे.

पारशी लोक 'टॉवर ऑफ सायलेन्स'मध्ये मृतदेहांवर अंत्यसंस्कार करतात किंवा मृतदेह ठेवतात. हा टॉवर एखाद्या टेकडीवर बांधलेला असतो. या टॉवरच्या तळाशी सुमारे ३०० फूट परिघाचा एक गोलाकार ओटा असतो. या ओट्याच्या मध्यभागी सुमारे ११० फूट परिघाची गोलाकार विहीर असते. गोलाकार ओट्यावर मृतदेह ठेवला जातो.

१५ ते ३० मिनिटांत गिधाडे गोळा होऊन त्या मृतदेहावरचे सर्व मांस खाऊन त्याचे रूपांतर हाडांच्या सापळ्यात करतात. हवा व तापमान यांच्यामुळे हाडे वाळल्यावर ती ओट्याच्या आतील भागातील विहीरीत टाकली जातात. तेथे विघटन होऊन त्यांचा भुगा होतो. भिंतीमध्ये असलेल्या छिद्रांतून पावसाचे पाणी विहीरीत येते व हाडांचा भुगा या पाण्याबरोबर वाहून जातो व मातीत मिसळला जातो. अशा प्रकार मृतदेहाची चांगल्या रितीने विल्हेवाट लावली जाते. ही पद्धत कमी खर्चाची, कमी वेळ लागणारी आहेच; पण यात भुकेल्या गिधाडांनं अन्नही मिळते. मृतदेह जाळल्यामुळे होणारा धूर, प्रदूषण हे त्रासही वाचतात. मुख्य म्हणजे मृत्यूबद्दलची अनावश्यक व क्लेषदायी भावनिकताही यात नसते.

मोर आणि इतर पक्षी

रानात एकदा पक्ष्यांची सभा भरली. अनेक पक्षी सभेला हजर होते. सर्वांना वाटले, आपल्याला एक राजा असावा. कोणाला राजा करावे, याबद्दल चर्चा सुरू झाली. मोराचे सौंदर्य डोळ्यात भरले. त्यालाच राजा करावे, असे ठरले. मोरानेही पिसारा फुलवून याला मान्यता दिली.

इतक्यात कावळा उभा राहत म्हणाला,

''मोर महाराज, क्षमा करा. पण माझ्या एका प्रश्नाचे उत्तर द्याल काय?'' यावर मोर म्हणाला, ''बोल मित्रा, तुझ्या मनात ज्या शंका, कुशंका असतील त्या सांगून मोकळा हो. आमच्याकडून तुला अभय आहे.''

तेव्हा कावळा म्हणाला, ''महाराज, आता राजा झाल्यावर आमच्या सर्वांच्या संरक्षणाची जबाबदारी तुमच्यावर आहे. पण समजा, आपला मूळचा स्वभाव उफाळून येऊन घार, गरूड यांनी आम्हासारख्या गरिबांवर हल्ला केला, तर आपण कशाने आमचे रक्षण कराल? हे जर तुम्ही आम्हाला सांगितले, तर आम्हाला तुमच्या भरोशावर निश्चिंत राहता येईल. इतकीच माझी नम्रतेची मागणी आहे.'' कावळ्याचा बिनतोड सवाल ऐकताच सर्वांना मोराचा कमकुवतपणा लक्षात आला. एका सौंदर्याशिवाय मोराजवळ लढण्याचे कोणतेही साधन नव्हते. सर्वांना आपली चूक कळून आली. मग सगळे पक्षी एका सुरात म्हणाले,

''या नाजूक आणि सुंदर असलेल्या मोराकडून आमचे कसलेही संरक्षण होणार नाही. एखाद्या बलवान आणि सामर्थ्यवान पक्ष्याला आपला राजा केले, तरच आपले संरक्षण होईल, यावर सर्वांचे एकमत झाले.''

तात्पर्य : सौंदर्य, श्रीमंती यापेक्षा चातुर्य, युक्ती आणि बल याची योग्यता अधिक असते.

जीवन चक्र

भारतवर्ष के विभिन्न प्रान्तों में ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय के हजारों राजयोगी किसान भाई बहिनें इस प्रकार की यौगिक खेती द्वारा पौष्टिक एवं स्वादिष्ट अन्न, फल आदि तैयार कर रहे हैं। इस पुस्तक में किसानों के ऐसे अनेक हृदयस्पर्शी अनुभवों को दर्शाते हुए प्रकृति को अपना सहयोगी बनाने, बीज वा धरती माँ को शक्तिशाली, गिरोही बनाने की भिन्न–भिन्न विधियां बताई गई हैं। आशा है सभी प्रकृति प्रेमी, कृषि वैज्ञानिक तथा कृषक भाई बहिनें इस पुस्तक को ध्यान से पढ़कर योग के प्रयोग करने की यथार्थ विधि को स्वयं भी अपनायेंगे तथा अन्य किसानों को भी इसकी प्रेरणा देकर अपनी–अपनी खेती में १०० प्रतिशत सफलता प्राप्त करके अपने देश को धन–धान्य सम्पन्न बनायेंगे। संत दर्शनसिंह जी महाराज फ़रमाया करते थे कि जैसे बाहर अंतरिक्ष (Outer space) है, वैसे ही अन्दर की भी दुनिया (Inner space) है और उस दुनिया को हमें खोजना है, उसमें जाना है। उस दुनिया में हम तब जा सकते हैं, जब हमारी अंतर की आँख खुली हो, अंदरूनी कान खुले हों, यहाँ शिव–नेत्र पर हम एकाग्र होते हों।

महापुरुषों ने हमें समझाया है कि इस शरीर में नौ दरवाज़े हैं, जिनसे हमारा ध्यान बाहर की दुनिया में जाता है लेकिन एक दसवां द्वार भी है जिसे शिव–नेत्र कहा गया है, Single या Third Eye कहा गया है, जो बाहर की दुनिया में नहीं खुलता, लेकिन अन्दर की दुनिया में खुलता है, उस तरफ़ हमें ध्यान देना है। जब हम उस तरफ़ ध्यान देंगे, तो हम प्रभु के शब्द के साथ जुड़ सकेंगे और शब्द के साथ जुड़ना प्रभु के साथ जुड़ना है। आगे अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं : **लोक पतिआरे कळू न पाईए । साचि लगै ता हउमै जाईए ।।**

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

संसार में हरेक मनुष्य चाहता है कि मेरा जीवन सात्विक हो, मैं अच्छे कार्य करूँ, महान बनूँ और मेरे जीवन में शान्ति बनी रहे, परन्तु इच्छा होना एक बात है और उस इच्छा को साकार करने के लिए पुरुषार्थ करना दूसरी बात है। देखा गया है कि लोग चाहते कुछ है और करते कुछ और... । चाहते हैं शान्ति परन्तु परिस्थिति वश, संस्कार वश कर्म ऐसे कर बैठते हैं जिस कारण उनके अपने और दूसरों के जीवन में अशान्ति ही पैदा हो जाती है। चाहते हैं स्नेह और प्रेम लेकिन बात ऐसी कर लेते हैं जिससे गलतफहमी, मनमुटाव, संघर्ष और नफरत को बढ़ावा मिलता है। चाहते हैं कि स्वास्थ्य अच्छा हो परन्तु सात्विक अन्न की कमी के कारण शरीर में स्वास्थ्य नाशक, रोगोत्पादक तथा उत्तेजनात्मक विषैले तत्व इकट्ठे होने लगते हैं। जो न केवल शरीर के लिए हानिकारक होते हैं बल्कि मानसिक सन्तुलन को भी बिगाड़ते हैं। निर्णयशक्ति को विचलित कर देते हैं, मानसिक आवेग को अनियंत्रित, असन्तुलित, अमर्यादित या दिशा भ्रष्ट कर देते हैं इसलिए मनुष्य के आहार का उसके आचार विचार और व्यवहार से गहरा सम्बन्ध है।

प्राचीनकाल से यह कहा जाता है कि अन्न का मन पर प्रभाव पड़ता है और मन का स्वास्थ्य व रोगों से गहरा सम्बन्ध है। कहते हैं, जैसा अन्न वैसा मन, जैसा मन वैसा तन इसलिए तनावमुक्त, व्यसनमुक्त, चरित्र सम्पन्न जीवन जीने के लिए भोजन का अकथनीय महत्व है। सभी मनुष्यों का लक्ष्य यही है कि हम शान्त, शीतल और सात्विक वृत्ति को धारण कर सुखमय व आनंदित जीवन जीये और इस लक्ष्य तक पहुँचने के लिए मन को वश करना आवश्यक है। मन को वश करने के लिए हमें अन्न की परहेज पर ध्यान देना बहुत जरुरी है। ऐसे समय पर सात्विक और पौष्टिक अन्न का निर्माण करने के लिए शाबत यौगिक खेती पद्धति बहुत ही लाभदायक है।

(प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : कशी दिसतेय मी...

नवरा : प्रियंका चोप्रा दिसतेयस...

बायको : खरच... डॉन मधली की क्रिश मधली

नवरा : बर्फी मधली...

गुरूजी : कोंबडी आधी का अंड?

गणेश : आधी चणे, मग अंड, मग २ बीयर, शेवटी कोंबडी आणि बील

गुरूजी कोमात जातात

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

समुद्र ह्यथपर्यंत पसरलाय मि
ह्यथे कुस्रा किनाराही बेंगाळतोय
कुस्राच्या टोकास जाण्यासाठी थांबलेला
होय ह्यथेच
अनंत काळपर्यंत टिकणारे
आपले वर्तमान आहे
ते कुस्रसही नाही
तक्षेच ते
इतस्त्र कुठेही नाही

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
मिंगार मो. ९४०३७३४८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

अथवा – २०० ग्राम वायविडंग कूटकर २ लीटर पानी में डालकर यह पानी एक लीटर पानी होने तक उबालें। ५ लीटर दूध उबालकर मलाई निकालकर यह दोनों २०० लीटर पानी में डालकर छिड़कांएँ।

अथवा सवेरे सूर्योदय होने से पहले जिस दिशा से हवा आती है उसी दिशा में देशी गाय के गोबर की गोणियां जलाकर धुआँ निकालें और उस गोणियों की राख को फसल पर छिड़कायें।

काळजी टेन्शनमुळे खरोखरच घरातील वातावरण जर सुरक्षित व प्रेमळ नसेल, घरामधून भावनिक आधार, कौतुक व प्रोत्साहन मिळत नसेल, वारंवार भांडणे, तिरस्कार केला जात असेल, तर मुली घराबाहेर प्रेम आणि आधार शोधतात. कारण प्रेम, सुरक्षितता, भावनिक आधार, आपलेपणा यासाठी प्रत्येक जण आसुसलेला असतो. अशा वेळी घरामध्ये दूषित व असुरक्षित वातावरण असेल तर प्रेम मिळवण्यासाठी आपले हक्काचे कोणीतरी आहे हे म्हणण्यासाठी, मुली दुसऱ्याला आकर्षित करून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यातच एखाद्या तरुण मुलाकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला तर, 'मीही कोणाला तरी आवडते' ही भावना वारंवार मनात येते. त्यात तो तरुण प्रेमाने बोलत असेल, भेटवस्तू दिली असेल, तर या मुली त्याच्यासाठी काहीही करायला तयार होतात. त्यांना दुसरे काहीच आठवत नाही. जन्मदाते आईवडीलसुद्धा शत्रू वाटायला लागतात. म्हणूनच पालकांनो, मुलींच्या या वयात सावध राहा. १३ ते १७ हे वय खरोखरच परिपक्व नसते. या वयात प्रेमात पडलेल्या मुली वय, जात, धर्म, व्यवसाय, नोकरी, नातेसंबंध, व्यसन या कशाचाही विचार करत नाहीत. या वयात कोणीही आवडायला लागते. कारण या वयात शरीरामध्ये हार्मोन्सची निर्मिती होऊन भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाटायला लागते. त्यातच टिव्हीवरील बीभत्स जाहिराती, सिनेमामधील आयटम सॉंग, उत्तेजक दृश्ये हे प्रेमात पडायला पोषक ठरते.

वरीलप्रमाणे अनेक रुग्ण चुकलेली वाट दुरुस्त करण्यासाठी क्लिनिकमध्ये येतात. या वयात केवळ आकर्षणापोटी मिठी किंवा चुंबन असे प्रकार घडतात. ज्या घरामध्ये आईवडिलांमध्ये कायम वादविवाद, भांडण, वडिलांचे दारूचे अति व्यसन, त्यामुळे कुटुंबाकडे दुर्लक्ष असे वातावरण असते अशा घरांमधील मुली बाहेर प्रेम शोधतात. काही उच्चशिक्षित पालकही पैशाच्या मागे धावताना मुलींसाठी हवा तेवढा वेळ देत नाहीत. अशा वेळी असुरक्षिततेची भावना निर्माण होऊन घराबाहेर प्रेम शोधले जाते. मुलामुलींवर चांगले संस्कार होण्यासाठी पालकांनी वेळ द्यायला हवा. म्हणूनच पालकांनो, एखादे काम कमी करा. परंतु आपल्या तारुण्यातील मुलीकडे लक्ष द्या. याचा अर्थ असा नव्हे, की तिच्याकडे सारखेच सार्शक नजरेने बघा तर बोलताना तिला आपुलकीने प्रश्न विचारा. रागावून 'कुठे गेली होतीस? कोणाबरोबर बोलत होतीस? घरी यायला इतका उशीर का झाला? सारखी आरशामध्ये काय बघत असतेस? इतका नट्टापट्टा कोणासाठी करायचा?' असे प्रश्न वारंवार विचारू नका.

– डॉ. शारदा निर्मल–महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहमदनगर

मोबाईल नं– ८७९३४००४००

जंगले नष्ट करुन वाढलेल्या शहरीकरणामुळे मानव आणि प्राण्यांमध्ये संघर्ष

डॉ. सुनिल तुंबारे यांचे प्रतिपादन; जागतिक पशुचिकित्सा दिनाचा जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय व जायंट्स ग्रुपचा संयुक्त उपक्रम

नगर – प्राण्यांपासून निर्माण झालेल्या बहुतांश गंभीर आजारावर उपाय नाही. जंगले नष्ट करुन वाढलेल्या शहरीकरणामुळे मानव आणि प्राण्यांमध्ये संघर्ष निर्माण होत आहे. जंगली प्राणी अन्न-पाण्यासाठी शहराकडे धाव घेत आहे. वन हेल्थ हा एक सर्वसमावेशक, एकात्मिक दृष्टीकोन असून, मानव, पाळीव आणि वन्य प्राणी, वनस्पती आणि व्यापक वातावरण यांचे आरोग्य जवळून जोडलेले आणि एकमेकांवर अवलंबून आहे. ही घडी विस्कटली जात असताना मानवाला यामध्ये पुढाकार घेऊन समतोल साधण्याची गरज निर्माण झाली असल्याचे डॉ. सुनिल तुंबारे यांनी सांगितले.

जागतिक पशुचिकित्सा दिनाच्या जिल्हा पशु वैद्यकीय सर्व चिकित्सालय व जायंटस् ग्रुपतर्फे आयोजित संयुक्त उपक्रमात पशुंची निःशुल्क चिकित्साप्रसंगी मोफत औषध वितरण प्रसंगी उपायुक्त डॉ. सुनील तुंबारे, डॉ. मुकुंद राजळे, संजय गुगळे, विद्या तन्वर, नुतन गुगळे, अनिल गांधी आदी.

जागतिक पशुचिकित्सा दिनानिमित्त शहरात जनावर व पशुंची निशुल्क तपासणी करुन त्यांना रोग प्रतिबंधक (अॅन्टी रेबीज), धनुर्वातचे लसीकरण करुन जंत प्रतिबंधक मोफत औषधे देण्यात आली. जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय व जायंट्स ग्रुप ऑफ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या शिबिराला शहरातील पशुपालकांचा सहभाग लाभला.

जुने बस स्थानक जवळील जिल्हा पशु सर्व चिकित्सालय हॉस्पिटलमध्ये झालेल्या या शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. सुनिल तुंबारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त डॉ. मुकुंद राजळे, जायंट्स ग्रुपचे विशेष कमिटी सदस्य संजय गुगळे, फेडरेशन ऑफिसर विद्या तन्वर, सचिव नुतन गुगळे, अनिल गांधी, आमी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, अभय मुथा, अनिल गांधी, अमित मुथा, सुनिल खिस्ती, अमित मुनोत, दीपक मुथा, पशुचिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर काळे, डॉ. वसंत गारुडकर, डॉ. वर्षा साबळे, डॉ. शशीकांत कारखिले, डॉ. अनिल भगत, बाबासाहेब कडूस आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. मुकुंद राजळे म्हणाले की, प्राण्यांपासून विविध आजार पसरत असून, त्यामुळे पाळीव प्राण्यांची निगा राखणे वेळोवेळी त्यांच्या आरोग्यावरुन लक्ष देणे प्रत्येक पशु पालकाचे कर्तव्य आहे. पशू सेवा हे मोठे पुण्याचे काम असून, मागील ३० वर्षापासून जायंट्स ग्रुप पशु-प्राण्यांच्या सेवेसाठी शिबिरांच्या माध्यमातून पुढाकार घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

संजय गुगळे म्हणाले की, पशुरोग ही ईश्वरसेवाच आहे. मुक्या प्राण्यांना दया दाखविणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे. पशुपक्षी आपल्या भावना त्यांच्या वेगळ्या भाषेतून व्यक्त करतात. त्यांचे दुःख वेदना समजून पशुचिकित्सक त्यांच्यावर सर्व प्रकारचे उपचार करत आहे. जायंट्स ग्रुपच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमाची माहिती देवून, सर्व जनावरांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे हे ३० वे वर्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात नव्याने रुजू झालेले पशुधन विकास अधिकारी डॉ. शरद औताडे, डॉ. श्रीधर गडेवार, डॉ. स्नेहा जगदाळे, डॉ. शुभांगी व्यवहारे, डॉ. विनोद पाळंदे यांचा सत्कार करण्यात आला. या शिबिरात घोडे, कुत्रे, गाई, म्हशी, मांजर, शेळ्या आदी २२० पाळीव प्राण्यांची आरोग्य तपासणी करुन उपचार करण्यात आले. तसेच गरजेनुसार मोफत औषधही वितरीत करण्यात आले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी इन्टारषचे सचिन खेडकर, वेलकॉन निमल्सचे मंगेश पेन्नानवार, राकेश फार्मचे किशोर पाटील, इंडियन हर्बचे घोडके, शारदा एजन्सीचे दिनेश चिंदे, अजय मेडिकलचे दर्शन गुगळे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजकुमार चव्हाण यांनी केले. आभार डॉ. ज्ञानेश्वर काळे यांनी मानले.

घर घर लंगर सेवेची मतदार जागृतीच्या सेल्फी पॉईंटचे अनावरण करतांना धनंजय भंडारे. समवेत हरजिसिंग वधवा, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, कैलास नवलानी आदी.

अन्न छत्रालयाबाहेर मतदार जागृतीच्या सेल्फी पॉइंटचे अनावरण

घर घर लंगर सेवेची मतदार जागृती

नगर – घर घर लंगर सेवेच्या तारकपूर येथील अन्न छत्रालयात सेवादारांनी मतदार जागृतीसाठी पुढाकार घेतला असून, अन्न छत्रालयाबाहेर मतदार जागृतीसाठी सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे. या सेल्फी पॉईंटचे अनावरण लायन्स क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष धनंजय भंडारे यांच्या हस्ते झाले.

यावेळी हरजिसिंह वधवा, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, कैलास नवलानी, सोमनाथ चिंतामणी, प्रशांत मुनोत, राजू जग्गी, प्रमोद पंतम, जय रंगलानी, राहुल बजाज आदी उपस्थित होते.

अन्न छत्रालयात जेवणाचे पाकिट घेण्यासाठी येणाऱ्या सर्वसामान्य कामगार वर्ग, रुग्णाचे नातेवाईक व गरजू घटकांना लोकसभेच्या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करुन, जसे पोटासाठी जेवण तसे देशासाठी मतदानचा संदेश देण्यात येत आहे. तर सेल्फी पॉईंटवर फोटो घेऊन नागरिकही मतदार जागृती करत आहे. सेल्फी काढू मतदानही करु!, माझे मत माझे भविष्य.., मताचा अधिकार लोकशाहीचा सन्मान... आदी घोषवाक्य सेल्फी पॉईंटवर लिहिण्यात आलेले आहे.

धनंजय भंडारे म्हणाले की, शंभर टक्के मतदान झाल्यास चांगला व सक्षम उमेदवार निवडून येण्यास मदत होणार आहे. पक्षास टक्के पेक्षा कमी मतदान होणे हे लोकशाहीला घातक आहे. कोणत्याही अमिषाला बळी न पडता, निर्भय व धर्मनिरपेक्षपणे मतदान करुन लोकशाही सक्षम करण्याचा प्रत्येक भारतीयाने संकल्प करण्याचे सांगितले.

हरजिसिंह वधवा म्हणाले की, मतदानाने लोकशाही मजबूत होणार आहे. मतदान हे आपल्यासह भावी पिढीचे भवितव्य घडविणारे आहे. मतदान करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य असून, देशाची लोकशाही सशक्त करण्यासाठी या प्रक्रियेत सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले. जनक आहुजा यांनी आपल्या मतातून लोकशाहीला बळ मिळणार असून, प्रत्येकाने मताचा अधिकार बजावण्याचे स्पष्ट केले.

'विचार भारती'च्या मतदार जनजागृती मोहिमेला शहरात प्रतिसाद

अखंड भारतासाठी, नारी शक्तीच्या निर्धारासाठी, भयमुक्त अहिल्यानगरसाठी १०० % मतदानाचा संकल्प

विचार भारतीच्या मतदार जागृती अभियानासाठी उभारण्यात आलेल्या सेल्फी बुथवर नागरिक उत्स्फूर्तपणे सेल्फी घेत प्रतिसाद देत आहे.

नगर – विचार भारतीच्या नुकत्याच झालेल्या जनसंवाद या उपक्रमाचा दुसरा भाग म्हणून १०० टक्के मतदान होण्यासाठी मतदार जागर अभियानास सुरवात झाली आहे. जागर मतदारांचा या अभियानात विचार भारतीच्या वतीने नगर शहरात २५ ठिकाणी सेल्फी पॉइंट उभे केले असून त्याद्वारे आपले मतदान कशासाठी याबाबत जागर व आवाहन करण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ महानगरपालिके जवळील पावन गणपती मंदिरात जागतिक कीर्तीच्या चित्रकार अनुराधा ठाकूर यांच्या हस्ते झाला. तसेच ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर व दिल्लीगेट येथील शमी गणपती मंदिर येथे श्रम्य चिकित्सक डॉ. सतीश सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला. सेल्फी बॅनर वर छापलेले घोषवाक्य भावल्याने सर्व ठिकाणांच्या सेल्फी पॉइंटवर नागरिकांनी सेल्फी घेत १०० टक्के मतदानाचा संकल्प केला. हा उपक्रम १३ मे पर्यंत शहरात राबवण्यात येणार आहे.

यावेळी अनुराधा ठाकूर म्हणल्या, आपला भारत हा सर्व जगात सर्व मोठी लोकशाही असलेले राष्ट्र आहे. त्यामुळे नागरिकांनी खूप सजग राहून कर्तव्याच्या भावनेने आपल्या लोकशाहीसाठी योग्य ठिकाणी मतदान करणे आवशयक आहे. देशाची प्रगती आता खूप वेगाने होत आहे. त्यामुळे आगामी काळात देशात मोठे अमुलाग्र बदल दिसणार आहेत. आपल्या भारताच्या विकासासाठी सर्व नागरिकांनी मतदानाचे कर्त्तव्य न चुकता राबवावे. विचार भारतीच्या वतीने नारी शक्तीचा सन्मानासाठी हा उत्कृष्ट उपक्रम राबवला आहे.

डॉ. सतीश सोनवणे म्हणाले, लोकशाहीच्या व राष्ट्राच्या हितासाठी १०० टक्के मतदान होणे आवश्यक आहे. यासाठी विचार भारतीच्या वतीने जनजागृतीचा योग्य व अत्यावश्यक उपक्रम हाती घेतला आहे. नागरिकांनी या मोहिमेस प्रतिसाद द्यावा, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात ब्रॉडकस्ट प्रमुख्य मनोज झंवर यांनी उपक्रमाची माहिती देत सांगितले, विचार भारतीच्या वतीने शहरात २५ महत्वाच्या ठिकाणी सेल्फी पॉईंट उभारण्यात आले आहेत. सेल्फी बुथवर लावण्यात येणाऱ्या सेल्फी फलकावर मतदान जागृतीसाठी विविध घोषवाक्य लिहिण्यात आलेली आहेत. यामध्ये माझे मत अखंड भारतासाठी, माझी संपत्ती माझा अधिकार त्यासाठी १०० % मतदान, नारी शक्तीचा निर्धार त्यासाठी १००% मतदान, भयमुक्त अहिल्यानगर त्यासाठी १००% मतदान, काशी व मथुरेचे उत्थान त्यासाठी १००% मतदान व लव्ह जिहाद करू हद्दपार त्यासाठी १००% मतदान. या आशयाचे घोषवाक्य लिहिण्यात आलेली आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी जेथे शक्य असेल त्याठिकाणी विचार भारतीच्या सेल्फी बुथवर जावून स्वतःचा सेल्फी घेऊन तो इंस्टाग्रामवर पोस्ट करावा.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव सुधीर लांडगे यांनी केले. उपाध्यक्ष अनिल मोहिते यांनी आभार मानले. यावेळी भारतीचे प्रवर्तक रवींद्र मुळे, ॲड. सुधीर झरकर, रवींद्र बारस्कर, कमलेश भंडारी, डॉ.विक्रम दीडवाणिया, मनीषा मुळे, दिपाली दीडवाणिया, किरण बारस्कर, माया बाबळे, मयूर बोधूघोळ, बबलू रावदेव, रणजीत वाकळे, विशाल गणपती मंदिराचे ट्रस्टी पंडित खरपुडे, अनंत देसाई, किशोर गांधी, सौ. गांधी, मिलिंद क्षीरसागर आदी उपस्थित होते.

दुःखमुक्त जीवनाच्या आनंदाचे गूज गीता सांगते

वेदांताचे अभ्यासक आचार्य श्रीगुरू डॉ.सुनिल लुले यांचे प्रतिपादन

नगर –दुःखमुक्त जीवनाच्या आनंदाचे गूज भगवान श्रीकृष्ण श्रीमद् भगवत गीतेमध्ये सांगतात. गीतेच्या माध्यमातून भगवान श्रीकृष्णांनी केलेले मार्गदर्शन आजही मोलाचे वाटते. असे वेदांताचे अभ्यासक आचार्य श्रीगुरू डॉ.सुनिल लुले यांनी सांगितले.

श्रीमद् आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त येथील ग्रंथराज दासबोध वाचन निरूपण मंडळाच्यावतीने रासनेनगरमधील श्रीदुर्गामाता मंदिराच्या सभागृहात आयोजित केलेल्या तीन दिवसीय प्रवचनमालेचे पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजनानंतर एस.एम.कुलकर्णी यांनी स्वागत करताना अशोक भोंग हे ग्रंथराज दासबोधचे वाचन-निरूपण वर्षभर विनाखंड येथे करत आहेत. यास चार वर्षे पूर्ण होत आली, आशी माहिती दिली. विविध क्षेत्रात योगदान दिलेल्या वेदमूर्ती दत्तोपंत पाठक गुरूजी, प्रा. मधुसूदन मुळे, इंजि. एन.डी. कुलकर्णी, कवीवर्य चंद्रकांत पालवे, साहित्यिक मिलिंद चवंडके, विश्वनाथ पोतदार, अरुण आहेर, जालिंदर बोस्डे, सौ.मालती गोरे व पुष्पा नातू यांचा सन्मान श्रीगुरू डॉ. लुले यांच्या हस्ते करण्यात आले. सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन सर्वोत्तम क्षीरसागर आणि शिरीष कुलकर्णी यांनी केले.



श्रीमद् आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त येथील ग्रंथराज दासबोध वाचन निरूपण मंडळाच्यावतीने रासनेनगरमधील श्री दुर्गामाता मंदिरात आयोजित प्रवचन मालेचे पुष्प गुंफताना वेदांताचे गाढे अभ्यासक आचार्य श्री गुरू सुनील लुले.

श्रीगुरू डॉ. लुले पुढे म्हणाले, जीवनात काय बदल घडवून आणले पाहिजेत? या विचारापासून पहाटे श्लोकांची श्रीमद् भगवतगीता साकारली आहे. गीतेतील दुसरा अध्याय सांख्ययोगाचा आहे. जीवन आनंदाने प्रफुल्लीत कसे करावे? शोक या शत्रूपासून दूर कसे रहावे? यावे नेमके मार्गदर्शन हा दुसरा अध्याय करतो. सांख्य म्हणजे ज्ञान. ज्ञान हे प्रकाशाचे प्रतिक. आत्मस्वरूपाचे ज्ञान मिळविण्याची तळमळ हा पुरूषार्थ होय. उपनिषद हे श्रवणाचे शास्त्र तर ब्रम्हसूत्र हे मननाचे शास्त्र आहे.

करोडो किंमतीचा आलिशान बंगला, अत्याधुनिक कार, मोबाईल यांसह अद्ययावत सुविधांमध्ये सुख देण्याची क्षमता नसते, हे सत्य ध्यानी येते. शरिरापासून-इंद्रियांपासून सुख मिळते असे वाटते. गी आनंदस्वरूप आत्मा आहे, हे शास्त्र सांगते. मी आनंदघन आत्मा आहे असे समजले की जीव आणि आत्मा यांचे ऐक्य घडते. अज्ञानातून बाहेर येण्यासाठी गीतान्यास करावा. गीता माझ्यासाठी सांगितली हा भाव ठेवावा. त्यातून चिंतन सुरू होते. मोक्षाचे ज्ञान-आत्मस्वरूपाचे ज्ञान श्रीगुरू-सद् गुरू देतात. ते देहात अस्तून देहापासून अलिप्त असतात.

अंतःकरणातील आसक्तिसाठी प्रयत्न करताना मनाविरूध्द घटना घडल्यास दुःख वाटते. दुःख उगाळत बसणे म्हणजे शोक करणे. गत शोक आणि आगामी शोक यांची उदाहरणे देताना डायबेटीस, ब्लडप्रेशर, हायपरटेन्शन हे आजार शोक करण्यामधूनच उद्भवतात. जीवनाचा आनंद घेण्यासाठी या शोकापासून दूर राहा, असा सल्ला श्रीगुरू डॉ.लुले यांनी दिला.

दुसऱ्याची संपत्ती ओरबाडून गलेलठ्ठ झालेले नेते सुखी नसतातच. विविध आजारांचा सामना करत ते मोठमोठ्या हॉस्पीटलमध्ये उपचार घेत जेवन घालवतात. घरदार-कार सुख देत नाही. बंगले किती मोठे असले तरी त्यात सुख मिळत नाही, हे बंगल्यात रहाणारे अनुभवतात. सत्यगुण आणि भगवंताची कृपा जीवनाचा आनंद मिळवून देते.

ज्या घटना घडल्या त्यांचा शोक करत वेळ घालवू नये. पुढे काय करता येईल याचा विचार करावा. दुःख उगाळत बसल्याने ते कमी होत नाही तर त्याचे शोकात परिवर्तन होते. दुःखाच्या आवर्तनालाच शोक म्हणतात. शोकापासून निवृत्ती घेण्याचा मार्ग सांख्ययोगातूनच मिळतो, असे श्रीगुरू डॉ.लुले यांनी सोप्या शब्दात सांगितले. दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत वेदान्ताचे तत्वज्ञान सांगण्याची त्यांची शैली उपस्थितांना चांगलीच भावली. शहरासह उपनगरातील जिज्ञासू स्त्री-पुरूष भाविक उपस्थित होते.

अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयास व्हॅक्युम क्लिनर भेट देण्यात आले.

ऐतिहासिक वस्तू संग्रहालयास व्हॅक्यूम क्लिनर भेट

श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीचा उपक्रम

नगर – पाचशेपेक्षा अधिक वर्षाचा इतिहास असलेल्या शहराचा ऐतिहासिक ठेवा जतन करणाऱ्या अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्रास श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या वतीने स्वच्छतेसाठी व्हॅक्युम क्लिनर भेट देण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी रोटरीच्या अध्यक्षा देविका रेळे, प्रतिभाताई धूत, बैजाली कोलते, सविता काळे, आर्किटेक्ट निमल काळे, सुजाता बाबळे, संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. रवींद्र साताळकर, अभिरक्षक डॉ. संतोष यादव, कर्मचारी नारायण आव्हाड, आनंद कल्याण, रामदास सरसे, गणेश रणसिंग, बापू भोवते, संतोष दांगडे, कृष्णा धुमाळ आदी उपस्थित होते.

प्रतिभाताई धूत म्हणाल्या की, राज्यातील सुसज्य संग्रहालयांपैकी अहमदनगर संग्रहालय हे एक आहे. मोठा ऐतिहासिक ठेवा संग्रहालयात जतन करण्यात आला आहे. शासनाकडून अनुदान न घेता वस्तुसंग्रहालयाचे मोठे कार्य उभे राहिले आहे. या कार्याला अधिक वैभवता प्राप्त करण्यासाठी व हा ऐतिहासिक वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

रोटरीच्या अध्यक्षा देविका रेळे यांनी ऐतिहासिक वस्तू संग्रहालय अहमदनगरची वेगळी ओळख निर्माण करेल. भावी पिढीला आपल्या पूर्वजांचा इतिहास जतन करण्यात आलेल्या ठेव्यातून माहिती होणार असून, रोटरी प्रियदर्शनीच्या माध्यमातून वस्तू संग्रहालयास मदत केली जाणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

डॉ. रवींद्र साताळकर यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन संग्रहालयात ऐतिहासिक वस्तू आधुनिक पद्धतीने मांडण्यात आले असून, त्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरत आहे. सर्वांच्या सहकार्याने संग्रहालय सुसज्ज झाले असल्याचे स्पष्ट केले. आभार डॉ. संतोष यादव यांनी मानले.

श्री गुरु तेग बहादूर – हिंद की चादर

श्री गुरु तेग बहादूर साहेब – (१ एप्रिल १६२१ – ११ नोव्हेंबर १६७५) शिखांचे नववे गुरू यांचा जन्म अमृतसर या पवित्र शहरात झाला. त्यांची स्तोत्रे (गुरबानी) गुरु ग्रंथ साहिबजीमध्ये समाविष्ट करण्यात आली होती, त्यांच्या एकूण स्तोत्रांची संख्या पंचरा शगांमध्ये एकशे पंधरा आहे. त्यांचे बालपणीचे नाव त्यागमल होते. पायांडा खान विरुद्ध करतारपूरच्या लढाईनंतर शिखांनी त्यांना तेग बहादूर म्हणायला सुरुवात केली त्यावेळ तो महान तलवारबाज किंवा ग्लेडियटर असल्याचे सिद्ध झाले.

औरंगजेबाला भारताला एक इस्लामिक देश बनवायचा होता. भारताला दार-उल-इस्लाम बनवण्यासाठी आणि हे लक्ष्य लवकरात लवकर साध्य करण्यासाठी मुस्लिम आस्तिक राज्याने काशी, प्रयाग येथील हिंदू पंडित आणि झाडण (उपदेशक वर्ग) यांनी जबरदस्त धर्मांतर केले. यासाठी कुत्र्यांच, हरिद्वार आणि काश्मीरची ओळख पटवली. त्यांच्यावर सर्व प्रकारचे अत्याचार लोकून देण्यात आले. त्यांना इस्लामचा स्वीकार करावा किंवा मृत्युदंडाचा त्याग रहावे, असा अल्टिमेटम देण्यात आला होता. भारतात मोठ्या प्रमाणावर धर्मांतराची लाट आली आणि शेर अफगान खान या शाही व्हाईसरॉयने प्रथम काश्मीरच्या ही प्रथा वापरून पाहिली. हजारो काश्मिरी पंडितांची हत्या करण्यात आली आणि त्यांची संपत्ती लुटण्यात आली.

या वेळी, पंडित किरपा राम दत्त यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मण विशेषतः काश्मिरी पंडित मे १६७५ मध्ये आनंदपूर साहिब येथे श्री गुरु तेग बहादूरजी यांच्याकडे आले. त्यांनी गुरू साहिबांना त्यांच्या दुःखाची कहाणी सांगितली आणि त्यांच्या सन्मानाचे आणि विश्वासाचे रक्षण करण्याची विनंती केली. गुरू साहिबांनी त्यांचे विचार ऐकले आणि शांततापूर्ण मार्गाने बळजबरीने धर्मांतराच्या नापाक कृत्याचा प्रतिकार करण्याचे मान्य केले. प्रमुख शीख आणि काश्मिरी पंडितांशी प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर गुरू साहिबांनी धार्मिकतेसाठी आणि धर्म (धर्म) च्या स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान देण्याचा निर्णय घेतलाफगुरु साहिबांच्या सल्लयानुसार, काश्मिरी पंडितांनी एक बादशाहाकडे अर्ज केला आणि त्याऐवजी दिल्लीच्या शाही न्यायालयाने श्रीगुरु तेग बहादुरजींना या दरबारात हजर राहण्यास सांगितले. पण दुसरीकडे, शाही समन्स आनंदपूर साहिबला पोहोचण्यापूर्वी, गुरू साहिबांनी आपला मुलगा (गुरु) गोविंद साहिब यांना जुलै १६७५ मध्ये दहावे नानक म्हणून स्थापित केल्यानंतर दिल्लीच्या दिशेने प्रवास सुरू केला. भाई दयाल दास जी, भाई मति दास जी, भाई सती. दास जी आणि इतर अनेक शिखांनी गुरू साहिबांचे अनुसरण केले. जेव्हा श्री गुरु तेग बहादूर जी रोपरजवळील मलिकपूर रघरण गावाजवळ पोहोचले, तेव्हा मिझां नूर मोहम्मद खान यांच्या नेतृत्वाखालील शाही सशस्त्र तुकडीने गुरू साहिब आणि त्यांच्या काही प्रमुख अनुयायांना अटक केली. त्यांना बस्सी पठाणच येथील तुरुंगात ठेवले आणि दरशेल छळ केला. आता गुरू साहिबांची पाळी होती जे शांत आणि शांत राहिले. औरंगझेदने तीन पर्याय देऊन केले उदा: (१) चमत्कार दाखवणे, किंवा (२) इस्लाम स्वीकारणे किंवा (३) स्वतःला मृत्यूशी तयार करणे. गुरू साहिबांनी उत्तर दिले – गुरु कधीही स्वतःसाठी चमत्कार करणार नाही, ती संगतासाठी आहे.

इस्लाम स्वीकारणे म्हणजे माझ्या शीख धर्माची फसवणूक करण्यासारखे आहे.

मी स्वतःसाठी मृत्यू आनंदाने स्वीकारेन

गुरु तेग बहादूर आणि त्यांच्या तीन साथीदारांना नारनच्या काझीसमोर हजर करण्यात आले. काझी प्रथम मति दास यांच्याकडे वळले आणि त्यांना इस्लाम स्वीकारण्यास सांगितले. त्यांनी तसे करण्यास नकार दिला. त्याला तात्काळ मृत्यूची शिक्षा झाली.

जल्लादांना पाचारण करण्यात आले आणि गुरू आणि त्यांच्या तीनही साथीदारांना फाशीच्या ठिकाणी बसवण्यात आले. भाई मती दास गुरुकडे तळहात दाबून त्यांच्याजवळ आले, त्यांनी त्यांचे आशीर्वाद मागितले, ते म्हणाले की हौतात्म्य प्राप्त करणारा पहिला असल्याचा आनंद आहे.

गुरुंनी त्यांना आशीर्वाद दिला आणि सांगितले की त्यांनी स्वतःला आनंदाने परमेश्वराच्या इच्छेला समर्पित केले पाहिजे. त्याच्याबद्दल आणि त्याच्या कारणासाठी त्याच्या भक्तीबद्दल त्याने त्याची प्रशंसा केली. डोळ्यात अश्रू आणून त्यांनी त्यांना निरोप दिला की त्यांचे बलिदान इतिहासात कायमचे स्थान व्यापेल. मती दास यांनी गुरुंच्या चरणांना स्पर्श केला, मित्र आणि भावाला मिठी मारली आणि त्यांच्याचा जागी आला.

मतिदास ताठ उभे असताना दोन खांबांमध्ये बांधलेले होते. त्याला विचारण्यात आले की त्याच्याकडे काही बिमत शब्द आहेत का, ज्यावर मति दास यांनी उत्तर दिले, मी फक्त विनंती करतो की माझे डोके माझ्या गुरूकडे वळवावेत कारण मला फाशी देण्यात आली आहे. दोन जल्लादांनी त्याच्या डोक्यावर दुहेरी हातात करवत ठेवली. मती दास शांतपणे एक ओंकार म्हणत आणि जपजी साहिबचे पठण करू लागले, शिखांची सकाळची महान प्रार्थना.. त्याच्या डोक्यापासून कंबरेपर्यंत अर्ध्या भागात करवत होती. असे म्हटले जाते की शरीराचे दोन तुकडे केले जात असतानाही, सर्व मान संपेपर्यंत जपजी प्रत्येक भागातून हुमत राहिले.

सती दासांनी या क्रूरतेचा निषेध केला आणि प्रभारी लोकांशी कठोरपणे बोलले. त्याच्या निषेधाकडे दुर्लक्ष करुन त्याणाही छळ करण्यात आला. शेवटी त्याला कापसात गुंडाळून जिवंत जाळण्यात आले. गुरुंनी हे सर्व क्रूरता दिव्य शांततेने पाहिले.

दयाळ दास यांनी या नरसंहाराच्या आगीत गुरुंनी कृत्याबद्दल सम्राट आणि त्याच्या दरबारी लोकांशी कठोरपणे बोलले. त्यासेही ऐकण्यास सरकारी सेवांनी नकार दिला. त्यांनी त्याचा छळ केला आणि अखेरीस, त्याला गुन्हासच्चे बांधून एका भोजय कढईत टाकून जिवंत उकळले. त्याला कोळशाच्या ब्लॉकमध्ये जिवंत भाजण्यात आले. ३ शेखांवर अत्याचार करण्यासाठी गुरुंना जाणूनबुजून या रानटी कृत्यांचे साक्षीदार करण्यास भाग पाडले गेले.

मत दास, दियाल दास आणि सती दास यांना सलग तीन दिवस छळ करुन फाशी देण्यात आली.

गुरु तेग बहादूर यांचे शीर जलाल-उद्दीन जल्लाद नावाच्या जल्लादने कापले. फाशीची जागा एका वटवृक्षाखाली होती. (झाडाचे खोड आणि जवळची विहीर, जिथे त्याने आंघोळ केली होती ती अजूनही जतन केलेली आहे), आता चांदनी चौक, दिल्ली. या ठिकाणी महाराजा रणजित सिंह यांनी गुरुद्वारा सीशगंज साहिब बांधले होते.

त्याचे मस्तक गुरुंचे शिष्य भाई जैता यांनी आनंदपूर साहिबला नेले जेथे नऊ वर्षांचे गुरु गोविंद राय यांनी त्याचे अंत्यसंस्कार केले. अचानक आलेल्या वाळूच्या वादळाच्या अंधारात चौथ्यावर आलेला त्याचा मृतदेह चोरीला गेला. लखी शाह वंजारायच थाडसी धाडसामुळे ते गवताच्या ओझ्याखाली लपून ठेवलेले ते वाहून नेले. त्यानंतर त्याने आपल्या गुरुच्या अवशेषांवर अग्निसंस्कार करण्यासाठी आपल्या अल्पशा घराचा त्याग केला. याच ठिकाणी आज गुरुद्वारा रकाब गंज साहिब उभा आहे.

लेखक – सनी वधवा, मोबा. ९९६०६०५११५
उद्योजक, एमआयडीसी, अहमदनगर

कलारंग ड्राईंग ॲकेडमी चौपाटी कारंजा मित्रमंडळ व समर्थ मंडळाच्या पुढाकाराने शिवचरित्रकथेवर आधारीत रांगोळी प्रदर्शन ऋग्वेद भवन, चितळे रोड येथे २ मे पर्यंत पाहण्यासाठी खुले ठेवण्यात आले आहे.

कलागुणांची जोपासना होण्यासाठी बाल संस्कार शिबिराची गरज

पवन नाईक यांचे प्रतिपादन; रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती व राष्ट्र सेवा दलच्या बाल संस्कार शिबीराचा समारोप

नगर – बाल संस्कार शिबिर म्हणजे संस्कार मूल्य अंगीकारून बालमनाचा सर्वांगीण विकास साध्ण्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल असून मुलांमध्ये कला–गुणांची जोपासना होण्यासाठी आज अशा शिबिरांची खूपच गरज आहे. २९ वे वर्षे संस्कारमाला चालविली जात आहे, ही कौतुकाची बाब आहे. आपल्या मुलांसाठी शिबीर किती आवश्यक आहे हे पालकांच्या लक्षात घेऊन आपल्या पाल्याच्या आवडी–निवडी पाहून जास्तीत जास्त आनंदी व समाधानी राहण्यासाठी आपण पालक म्हणून किती सहभाग देतो याचा विचार पालकांनी करणे गरजेचे आहे. जी संस्कार मूल्ये शिबिर कालावधीमध्ये शिबिरार्थींनी आत्मसात केली आहे, त्याचे योग्य ते पालन करावे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पुरुषोत्तम आंतरराष्ट्रीय गायक पवन नाईक यांनी व्यक्त केले.

रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती व राष्ट्र सेवा दल अहमदनगर आयोजित बाल संस्कार शिबीराच्या समारोपप्रसंगी समितीच्या उपाध्यक्षा शोभाताई ढेपे, सचिव ॲड. रवींद्र शितोळे, विश्वस्त सुहास अंतरकर, जगन्नाथ गुंड, दत्ता जंगम व सेवा दलाचे बापू जोशी, पुरुषोत्तम जाधव, भीमराज कोडम, दत्ता देवगावकर व प्रशिक्षक आदि. यावेळी शिबीरार्थींनी विविध प्राव्हाशिके सादर केली. (छाया – यतीन कांबळे)

रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती व राष्ट्र सेवा दलाच्या वतीने आयोजित बालसंस्कार शिबीराच्या समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पवन नाईक यांनी व्यक्त केले. रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती व राष्ट्र सेवा दल अहमदनगर यांनी आयोजित बाल संस्कार शिबीराच्या समारोपप्रसंगी रावसाहेब पटवर्धन व साने गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी समितीच्या उपाध्यक्षा शोभाताई ढेपे, सचिव ॲड. रवींद्र शितोळे, विश्वस्त सुहास अंतरकर, जगन्नाथ गुंड, दत्ता जंगम व सेवा दलाचे बापू जोशी, पुरुषोत्तम जाधव, भीमराज कोडम व दत्ता देवगावकर आदि उपस्थित होते.

संस्थेचे सचिव व संस्कारमालेचे संयोजक ॲड. रवींद्र शितोळे यांनी स्वागत करून प्रास्ताविकात संस्थेच्यावतीने राबवित असलेल्या सामाजिक उपक्रमाची माहिती सांगितली. माणुसकीचे दूत व शिबिर प्रमुख शिवाजी नाईकवाडी यांनी शिबिर कालावधी मधील वृत्तांत सादर केला. १४ ते २६ एप्रिल या शिबिर कालावधीत डॉ. कल्पना दुबे, दिपाली देऊतकर, विनायक सापा, डॉ.अमित सपकाळ, उबाळे, शेलार, दत्ता देवगावकर, हर्षद कटारिया, प्रिया ओगले–जोशी, सुजाता वाऊजे–सब्बन, संस्थेच्या उपाध्यक्षा शोभाताई ढेपे, अरुण आहेर, विवेक पवार, भीमराज कोडम, रमेश चिप्पा यांनी शिबिरार्थींना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शिबिरार्थींना व्यवहार कौशल्याचे ज्ञानमिळाले या उद्देशाने भाजी बाजार भरविण्यात आला. यावेळी पालकांनी मुलांना खूपच चांगले उत्तेजन दिले. माणसात माणूसपण पेरण्यासाठी हीच आमुची प्रार्थना आणि हेच आमुचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे ही प्रार्थना सामुदायिक म्हणण्यात आली. तदनंतर शिबिरार्थी व पालक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. समितीच्या उपाध्यक्षा शोभाताई ढेपे यांनी पालकांचे विशेष आभार मानून हा संस्काराचा ठेवा कायमस्वरूपी सर्वांनी जतन करून ठेवावा असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे विश्वस्त गणेश गावडे यांनी यापुढेही आपण सर्वांनी संस्थेच्या विविध उपक्रमात हिरीरीने सहभागी व्हावे. तसेच राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते व माणुसकीचे दूत शिवाजी नाईकवाडी यांच्या अथक प्रयत्नाने हे शिबिर खूपच यशस्वी झाले. पालकांचे देखील खूप सहकार्य मिळाले असे सांगितले.

शिबिर कालावधीमध्ये शिबिरार्थींनी आत्मसात केलेल्या कलागुणांचे सादरीकरण केले. पालक व शिबिरार्थी यांनी आपले शिबिरा बाबत मनोगत व्यक्त केले. पालकांनी मनोगत व्यक्त करताना सलग तेरा दिवस आमच्या पाल्यांना संस्काराची शिदोरी देणारे व सर्वात कमी प्रवेश फी घेऊन ज्ञानदान करणारे हे एकमेव असे शिबिर आहे. वर्षभर उजळणी शिबिर घेण्यात यावे अशी विनंती केली.

शिबिरार्थी यांच्याकडून योगतज्ञ पुरुषोत्तम जाधव व अनघा राऊत यांनी योगा प्राव्यक्षिक करून घेतले. मतदार जागर हे पथनाट्य मुलींनी तर मुलांनी पाणी वाचवा हे पथनाट्य सादर केले. 'स्वर्गात आकाशगंगा' या गीतावर शिबिरार्थींनी लयबद्ध नृत्य सादर केले. पालकांनी सुद्धा त्या गाण्याचा मनमुराद आनंद घेतला. शिबिरार्थींनी आकर्षक असे क्वेस्स्थेनिक्स कवायत, लाठी–काठीचे प्रात्यक्षिक सादर केले. तालबद्ध मयूर लेझीम सादर करून उपस्थितांची शिबिरार्थी व शिबिर सहाय्यक शिक्षक यांनी मने जिंकली.

शिबीर यशस्वीतेसाठी राष्ट्र सेवा दलाच्या नेहा कडिले, साक्षी कडिले, संस्कृती कलकोटी, आर्या मिसाळ, नुपूर घटे, सार्थक भोंग, युवराज पाटील, ओम शिंदे, कृष्णा कडिले, आयुषा जाधव, गौरी मदने, रिद्धी मदने व श्रीया पटवा व कार्यकर्त्यांनी खूप परिश्रम घेतले.

अशा सामाजिक दायित्व असलेल्या उपक्रमाबद्दल कौतुक केले. यापुढेही अशा उपक्रमास आम्ही सहकार्य करू असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा व साक्षी कडिले यांनी केले.

शिबिरप्रमुख शिवाजी नाईकवाडी यांनी आभार मानले.

रांगोळी चित्रांतून होणार शिवरायांच्या चरित्राचे दर्शन

कलारंग ड्राईंग ॲकेडमी, चौपाटी कारंजा मित्रमंडळ व समर्थ मंडळाचा पुढाकार

नगर – महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून रांगोळी प्रदर्शनाच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांच्या चरित्रातील विविध प्रसंग पाहण्याची नामी संधी नगरकरांना चार दिवस मिळणार आहे. कलारंग ड्राईंग ॲकेडमी, चौपाटी कारंजा मित्रमंडळ आणि श्री समर्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिवचित्रकथेवर आधारित हे रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती श्रीशिवाजी महाराजांच्या जीवन चित्रावर आधारित असलेले हे प्रदर्शन ३० एप्रिल ते २ मे या दरम्यान सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत ऋग्वेद भवन, चितळे रोड, अहिल्यानगर येथे सर्वांना पाहण्यासाठी मोफत खुले आहे. कलारंग ड्राईंग ॲकेडमीच्या २९ विद्यार्थ्यांनी चार दिवसांच्या अथक प्रयत्नांतून महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेकापर्यंतचे प्रसंग ६ ते १० फुटांच्या १५ रांगोळ्यांद्वारे साकारले असून कलारंग ॲकेडमीच्या संचालिका चित्रकार, रांगोळीकार सुजाता औटी पायमोडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

संदेश बोडखे, मानस कुरापाटी, मानसी राठी, प्रथमेश झावरे, प्रचिती कुलकर्णी, सौम्या जाधव, जान्हवी डोंगरे, तनुश्री भळगट, आर्या निंबाळकर, स्नेहांकिता सरोदे, अर्धना ताटी, स्वरा कोळपकर, दुर्गा कानवडे, साक्षी देशमुख, शर्वरी वंगा, पल्लवी चव्हाण, अपूर्वा नांदुरकर, सृष्टी चिंतामणी, वेदांगी पाटील, शताक्षी लोणकर, समृद्धी बडे, पलक खंडेलवाल, आरती कटारिया, सेजल कटारिया, सिद्धी झोडगे, ईशा सादुल, श्रुती जोशी, रुतिका वाकळे, राजनंदिनी काळे या कलाकारांनी आपल्या कलेतून महाराजांना मानाचा मुजरा देण्याचा प्रयत्न केला आहे.

या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन कलारंग ॲकेडमी, चौपाटी मित्र मंडळ आणि श्री समर्थ मित्र मंडळाच्या सदस्यांनी केले आहे.

महाराष्ट्रदिनी 'माझी लोकशाही – माझा फळा फलक'लेखन स्पर्धेचे नगरमध्ये आयोजन

शाळांबरोबरच सार्वजनिक फलकांवर होणार मतदार जनजागृती

नगर– जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार अहमदनगर–शिर्डी लोकसभा मतदारसंघातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, बाळासाहेब कोळेकर यांच्या संकल्पनेतून १ मे – महाराष्ट्रदिनी शाळांमध्ये शैक्षणिक निकाल घेण्यासाठी आलेल्या पालकांमध्ये मतदार जनजागृती व्हावी म्हणून अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने शिक्षक, कलाशिक्षक व कलाकारांसाठी माझी लोकशाही–माझा फळा या फलकलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

माझा भारत–माझं मत, १३ मे रोजी मतदान कराच, अहमदनगर–शिर्डीच्या मतदार राजा जागा हो १३ मे रोजी मतदानाचा धागा हो यापैकी एका विषयावर आकर्षक व संकल्पनायुक्त फलकलेखन करावयाचे असून शाळा, शासकीय कार्यालये, धार्मिक स्थळे,चौकातील फळे, नोटीस–चूचनाफलक आदी फलकांचा वापर करता येईल.

आकर्षक रंगसंगतीच्या फलकलेखनाबरोबरच फलक आरेखन व सजावट देखील स्पर्धक करू शकतात तसेच मतदानाची १३ मे २०२४ ही तारीख व स्वतःचे नाव फलकावर येणे आवश्यक आहे. प्रत्येक तालुक्यातून प्राथमिक व माध्यमिक विभाग मिळून सहा क्रमांकासह एकूण ४५ विजेते घोषित केले जाणार आहेत.

शक्य झाल्यास नागरिक, ग्रामस्थ, पालक–शिक्षक यांच्याबरोबर फलकासह फोटो घेऊन आपापल्या सोशल मीडियावर #sveepahmednagar या हॅशटॅगसह अपलोड देखील करावेत. एका स्पर्धकास अनेक फलकलेखन करता येतील. सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी फलकलेखनाचे उत्कृष्ट फोटो देशातील पहिल्या अहमदनगर स्वीप केअर असलेल्या ९००२ १० ९००३ या व्हाट्सअप क्रमांकावर स्वतःचे संपूर्ण नाव, शाळेचे नाव, पत्ता फोन नंबरसह १० मे २०२४ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे .

तरी जास्तीत जास्त शिक्षक, कलाशिक्षक व कलाकारांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन राहुल पाटील (उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी), अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), मीना शिवगुंडे (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी), आकाश दरेकर (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी) प्रदीप पाटील (तहसीलदार–निवडणूक), बाळासाहेब बुगे (उपशिक्षणाधिकारी), डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत), प्रशांत गोसावी (निवडणूक नायब तहसीलदार) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींनी केले आहे.

भगवान महावीर जन्मकल्याणकनिमित्त शिस्त व भक्तीचा अनोखा संगम

सकल जैन समाज चांगली व आदर्श परंपरा भविष्यातही कायम ठेवेल : जैन मंदिर अध्यक्ष सुभाष मुथा यांचा विश्वास

नगर – नगर शहरातील सकल जैन समाजाने भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक उत्साहात साजरा केला. जगाला सत्य, अहिंसा, शांततेचा संदेश देणारे भगवान महावीर यांचे अनुयायी असणे हे जैन समाजातील प्रत्येकासाठी अभिमानाची बाब आहे. यंदा महावीर स्वामी जन्मकल्याणक निमित्त निघालेल्या भव्य शोभा यात्रेत सकल जैन समाज आपल्या कुटुंबियांसह सहभागी झाला होता. अतिशय शिस्तबध्द आणि उत्साही शोभायात्रा पहायला मिळाली. प्रत्येक जण अतिशय आनंदात आणि उत्साहात सहभागी झाल्याचे पहायला मिळाले. प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे यंदा शोभायात्रेदरम्यान कोणीही रस्त्यात प्रसाद वाटप केले नाही. आनंदधाम परिसरात प्रसाद वाटप करून एक अतिशय चांगला पायंडा पाडण्यात आला आहे. भविष्यातही सकल जैन समाज अशीच एकजूट व उत्साह कायम राखेल. महावीर स्वामी जन्मकल्याणक निमित्त कार्यक्रमांना मिळालेल्या प्रतिसादाबद्दल तसेच कार्यक्रमासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी आभार व्यक्त करीत कौतुक केले आहे.

महावीर स्वामी कल्याणक निमित्त निघालेल्या शोभायात्रा तसेच अन्य कार्यक्रमात सकल जैन समाजाने शिस्त व भक्तीचा अनोखा संगम दाखवून दिला.

सुभाष मुथा म्हणाले, यंदाच्या शोभायात्रेत सौ. सरोज कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद संस्कार शिक्षा अभियान मंडळाच्या मुला मुलींनी लेझीमचे आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच त्यांनी हातात जैन ध्वज व भगवान महावीरांचे संदेश असलेले फलक घेवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यंदाच्या शोभायात्रेचे हे मानिव्यपूर्ण आकर्षण ठरले. तसेच चौक सजावट व रांगोळी स्पर्धेलाही मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे वातावरण उत्साही बनले होते.

या स्पर्धेचे अतिशय उत्तम परीक्षण करण्याचे काम सौ. शैला गांधी व सौ. हेमा गुगळे यांनी केले. त्यांनी उन्हाची पर्वा न करता प्रत्येक चौक सजावट व रांगोळी पाहिली. सर्व सहभागी मंडळांनी अतिशय कल्पक सजावट करून भगवान महावीर स्वामींचे संदेश चांगल्या प्रकारे दिला. मंडळांनी प्रसाद वाटपही मिरवणुक मार्गावर न करता शेवटी केले. त्यामुळे एक चांगला व कायमस्वरूपी आदर्श निर्माण केला यासाठी सर्व मंडळे अभिनंदानास पात्र आहेत. आनंदधाम येथील कार्यक्रम नंतर गौतम प्रसादीची व्यवस्था केली होती. त्याचाही भाविकांनी लाभ घेतला.

महावीर स्वामी जन्मकल्याणक निमित्त निघालेली शोभायात्रा तसेच अन्य कार्यक्रमात सकल जैन समाजाने शिस्त व भक्तीचा अनोखा संगम दाखवून दिला. सायंकाळी आनंदधाम येथील भक्तीसंध्या कार्यक्रमही अतिशय सुंदर झाला.

सकल जैन समाजाचे सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अतिशय नेटके नियोजन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. जैन सोशल फेडरेशनचे सर्व कार्यकर्ते यांनी नियोजनात विशेष योगदान दिले.

पोलिस प्रशासन, प्रसारमाध्यमांनी या कार्यक्रमासाठी चांगले सहकार्य केले. हीच आदर्श परंपरा भविष्यातही कायम राहिल असा विश्वास सुभाष मुथा यांनी व्यक्त करीत सर्वांचे आभार मानले.

मंगलगेट येथे हनुमान जयंतीनिमित्त भंडारा प्रसादाचे वाटप करताना आ. संग्राम जगताप. समवेत सागर मुर्तडकर, प्रा. माणिक विधाते व प्रसादाचा लाभ घेणारे भाविक, युवक व महिला.

नगर शहरात धार्मिक वारसा जोपासून वर्चस्व ग्रुप सामाजिक चळवळ चालवत आहे

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; मंगलगेटला भंडारा, श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचा उपक्रम

नगर – वर्चस्व ग्रुप शहरात धार्मिक वारसा जोपासून सामाजिक चळवळ चालवत आहे. ग्रुपच्या युवकांनी हनुमान मंदिराचे जीर्णोद्धार करुन मंदिराचे रुप पालटले. धार्मिक परंपरा जोपासत असताना, सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आधार देण्याचे कार्य वर्चस्वने केले असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

वर्चस्व ग्रुपच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंगलगेट, वंजार गल्ली येथे भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. जगताप बोलत होते. प्रारंभी महाआरती करण्यात आली. तर राम लक्ष्मण जानकी, जय बोलो हनुमान की, जय हनुमान ज्ञान गुण सागर, जय कपीस तिहू लोक उजागर... या भक्ती गीतामध्ये भाविक तल्लीन झाले होते. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

पाहुण्यांचे स्वागत वर्चस्व ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सागर मुर्तडकर यांनी केले. प्रा. माणिक विधाते यांनी श्री हनुमान जन्मोत्सवाच्या भाविकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी परिसरातील भाविक, युवक व महिला उपस्थित होत्या.

अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुध्दिबळ स्पर्धेचे नगरमध्ये आयोजन

नगर – ३ ते ७ मे दरम्यान अहमदनगरच्या आनंदऋषी हॉस्पिटल शेजारी, बडीसाजन मंगल कार्यालया येथे शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

या स्पर्धेत भारतातून खेळाडू बुद्धिबळ खेळण्यासाठी येणार असून आतापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तामिळनाडू इत्यादी राज्यातून अडीचशेच्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. इंटर नॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी सहित अनेक दिग्ज खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत असे संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

साडेपाच वर्षाचा बाळ खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपले बुद्धीचे बळ पणाला लावणार आहे असे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

३ मे रोजी सकाळी ११.३० वाजता ह्या स्पर्धेचे उद्घाटन होणार असून, त्यानंतर स्पर्धा सुरू होणार आहे या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत. शेवटी दुपारी ३ वाजता नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. या स्पर्धेत विविध गटात तीन लाख रुपयांची प्रोत्साहन पर रोख बक्षिसे, आकर्षक ५० कपंडन व सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेचे प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जलगाव) हे असून त्यांना शार्दुल टापसे (सातारा) सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. ह्या दोघांना ६ सहाय्यक पंच मदत करणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या नियम नियमावली नुसार होणार आहे. तसेच या स्पर्धे त आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी पट व ताशीच्या घाव वापर महाराष्ट्रात पहिल्यांदा होणार आहे.

संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, देवेंद्र ढोकळे, रोहित आडकर, मनीष जरवनी, प्रकाश गुजराती, चेतन कड, देवेंद्र वैद्य, संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ आदी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील आहेत. गाहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क यशवंत बापट. ९३२६०९२५०१ व परूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८.

सावेडी नाका येथे ऑटो रिक्षा व टॅक्सी मालक संघटनेच्या स्थापना प्रसंगी आ. संग्राम जगताप. समवेत अध्यक्ष रामराजे शिंदे व इतर पदाधिकारी.

सावेडी नाका येथे ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक मालक संघटना स्थापन

नगर – लोकराज्य ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटनेची स्थापना २४ एप्रिलला आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, लोकराज्य ऑटोरिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामराजे शिंदे व ऑटो रिक्षा व टॅक्सी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सितारामा खाकाळ, जिल्हा कार्याध्यक्ष मुकुंद लखापती, शाखाप्रमुख गजू दंडवते, सल्लागार विष्णू काळे, शाखा उपाध्यक्ष विठ्ठल बारस्कर, सहसचिव शिवाजी शिंदे, सदस्य मच्छिंद्र शिंदे, बाबा राऊत आदी उपस्थित होते.

आ. जगताप म्हणाले, रिक्षा चालक–मालक संघटनेचे संस्थापाक अध्यक्ष रामराजे शिंदे यांचा सामजसेवेत मोठा वाटा आहे. सावेडी नाका येथे रिक्षा संघटना स्थापन केली प्रत्येक रिक्षा चालक यांना खूप अनेक अडचणी असतात, अनेक अडचणींना सामोरे जावे लागते त्यावेळी अडचणी दूर करण्यासाठी एक संघटना ह्वी असते. रामराजे शिंदे यांनी प्रत्येक वेळी लोकांच्या अडी–अडचणींना मदतीला धावून जातात आज संघटनेच्या माध्यमातून प्रॉब्लेम सोडवले जातात आज या संघटनेच्या माध्यमातून होत आहे असे आ. जगताप म्हणाले. आमार प्रदर्शन रामराजे शिंदे यांनी करत आ. संग्राम जगताप यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यावेळी सत्कार केला.

'द कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया' कार्यक्रम

नगर – देशाची राजधानी नवी दिल्लीतल्या संसद मार्ग परिसरात असलेल्या 'द कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत सरकारच्या माजी सचिव डॉ. अरुणा शर्मा होत्या. नवीदिल्लीत शासकीय सेवेनिमित्त रुजू झालेल्या अधिकाऱ्यांचे स्वागत, उत्कृष्ट कार्यक्षिल अधिकाऱ्यांचा गौरव आणि नवीदिल्लीतून बदली झालेल्या त्यांच्या सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांचा सत्कार असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

द कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडियातील नवी दिल्लीत शासकीय सेवेमध्ये रुजू झालेल्या अधिकाऱ्यांचा गौरव करताना डॉ. अरुणा शर्मा, निरंजन निर्मळ आदी.

यावेळी सेवानिवृत्त अधिकारी एस. एन. घोन्गाडे आणि अतुल चंद्र कुलकर्णी यांनी अनुभव कथन केले. त्यांच्या कार्यक्रमाला त्यांना आलेले अनुभव त्यांनी खूप व्यवस्थितपणे मांडले. युवा स्फूर्ती प्रतिष्ठान आणि 'पुढचे पाऊल' यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वतीने युवा स्फूर्तीचे संस्थापक अध्यक्ष निरंजन निर्मळ यांचा सत्कार करण्यात आला. नवीदिल्लीमध्ये युवा स्फूर्तीतर्फे असे कार्यक्रम नेहमीच घेण्यात येतात. महाराष्ट्रातल्या लोकांचे नवीदिल्लीत असणारे काम यानिमित्तानं होतं. नवीदिल्लीमध्ये कोणाला काही अडचण आल्यास प्रतिष्ठानच्या वतीने आणि अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

कार्यक्रमास डॉ. तनुजा, मनोज नेसरी, सुगंध चौगुले, प्रतिभा पारकर, आनंद पाटील, अय्यास तांबोळी, विनायक पाटील, चिन्मय गोटमारे, प्रवीण मेश्राम, डॉ. सुयश चव्हाण, वेल्हारी गायकवाड, संदीप काळे, शांतेश्वर खैरनार, स्वप्निल थोरात, अरविंद ढोके, अजय अक्षी उपस्थित होते.

अर्थजगत

डॉलरच्या तुलनेत रुपयातील घसरणीमुळे देशाच्या परकीय चलन गंगाजळीला सलग दुसऱ्या आठवड्यात झळ पोहचली. १९ एप्रिलला समाप्त आठवड्याच्या कालावधीत गंगाजळी २.२८ अब्ज डॉलरने कमी होऊन ६४०.३३ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे, असे रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीतून स्पष्ट केले. आधीच्या आठवड्यातही परकीय चलन गंगाजळी ५.०४ अब्ज डॉलरने घटली होती. त्यामुळे महिन्याच्या सुरुवातीला ६४८.५६ अब्ज डॉलर या सार्वकालिक उच्चांकी पातळीला पोहोचलेली परकीय चलन गंगाजळी सध्या सहा आठवड्यांच्या नीचांकी पातळीवर गडगडली आहे. पश्चिम आशियातील संघर्षाच्या चिंतेमुळे गेल्या आठवड्यात रुपया ८३.५७ या विक्रमी नीचांकी पातळीवर घसरला होता. मात्र रिझर्व्ह बँकेच्या डॉलर विक्रीद्वारे झालेल्या हस्तक्षेपानंतर तो किंचित सावरला.

आरोग्यविम्यामध्ये काय बदललं?

विमा कंपन्या आता मधुमेह, उच्च रक्तदाब, अस्थमा यासारख्या आजारांची माहिती न दिल्याच्या आधारावर केलेला दावा नाकारू शकणार नाही. सलग पाच वर्षे विमा हप्ता भरल्यानंतर कोणताही दावा नाकारता येणार नाहीत. यानुसार आरोग्य विम्यात व्यापक बदल करण्यात आले आहेत.

विमा नियामक संस्था इर्डाने विमाधारकांचे हित लक्षात घेता आरोग्य विमा योजनेत बरेच बदल केले. इर्डाने विमा दाव्यासाठीचा 'मोरेटोरियम पीरियड' कमी केला. त्याचवेळी प्री एक्झिस्टिंग डिसीज म्हणजेच अगोदरपासूनचे असलेल्या आजाराला विमा कवच देण्यासाठीचा प्रतीक्षा कालावधी देखील कमी केला. तसेच पॉलिसी खरेदी करण्यासाठी कमाल वयाची मर्यादा देखील काढून घेतली आहे. या बदलामुळे पॉलिसीधारकांना फायदाच होणार आहे.

■ मोरेटोरियम पिरियड कमी

विम्याच्या दाव्यासाठी मोरेटोरियम पीरियड ८ वर्षांवरून पाच वर्ष केला आहे. आता सलग ६० महिन्यांपर्यंत कवच दिल्यानंतर विमा कंपनी ग्राहकाचा कोणताही क्लेम 'नॉन डिस्क्लोजर' आणि 'मिसरिप्रजेंटेशन'च्या आधारावर नाकारू शकत नाही. केवळ त्यात गैरप्रकार आढळून आल्यानंतर विमा कंपनी दावा नाकारू शकते.

■ फायदा काय होणार

आरोग्याबाबतची माहिती लपविल्याच्या कारणावरून विमा कंपनीकडून दावा नाकारला जात होता. परंतु कंपनी या कारणावरून दावा नाकारू शकणार नाही. मधुमेह, हायपरटेन्शन, अस्थमासारख्या आजारांची माहिती न दिल्याबद्दल दावा नाकारला जात होता. परंतु आता सलग पाच वर्ष हप्ता भरल्यानंतर कोणताही दावा नाकारता येणार नाही.

■ 'पीईडी'साठी प्रतीक्षा कालावधीत घट

विमा कवच घेण्यापूर्वीपासून असलेल्या आजारांना विमा कवच देण्यायासाठीचा प्रतीक्षा कालावधी चार वर्षांवरून तीन वर्ष करण्यात आला. यामुळे मधुमेह, थायरॉईड, हायपरटेन्शन, अस्थमा यासारख्या क्रॉनिक आजारांवर लवकरच विमा कवच मिळेल. याप्रमाणे पॉलिसीधारकांना जुन्या आजारांवर विम्यातंर्गत उपचारासाठी ३६ महिन्यांपेक्षा अधिक काळ वाट पाहवी लागणार नाही. नवीन बदल एक एप्रिलपासून लागू झाले आहेत. 'इर्डा'च्या अधिसूचनेनुसार, पूर्वीपासून असलेल्या आजारावे निदान विमा कंपनीकडून जारी होणाऱ्या पॉलिसीच्या तारखेच्या ३६ महिने अगोदर झालेले असेल किंवा त्यावर उपचाराचा सल्ला दिला असेल तर अशा प्रकरणात प्रतीक्षा कालावधी हा ३६ महिन्यांपेक्षा अधिक नसेल. इर्डाच्या मते, आरोग्य विमा लागू होण्यापूर्वी ३६ महिन्यापर्यंत नमूद केलेल्या आजारावरील उपचारासा (अपघात वगळता) कवच दिले जात नाही. कालावधी पूर्ण झाल्यानंतर या आजारांना, उपचारांना विमा कवच दिले जाईल. यासाठी एकच अट ती म्हणजे पॉलिसीच्या नुतनीकरणात खंड पडलेला नसावा.

■ विमा कंपनीला द्यावी लागेल आजाराची माहिती

इर्डाने म्हटले, पॉलिसी खरेदी करताना विमाधारकाला आपल्या आजाराची संपूर्ण माहिती कंपनीला द्यावी लागेल. या आधारावर विमा कंपनी आरोग्य विम्यात पूर्वीपासून असलेल्या आजाराचा प्रतीक्षा कालावधी आणि विशिष्ट कालावधी कमी करण्याचा प्रयत्न करू शकते. मात्र हे नियम परदेशात प्रवासासाठी काढलेल्या पॉलिसीला लागू होणार नाही.

■ सुलभ योजना आणाव्यात

नियामक संस्थेने म्हटले, विमा कंपन्यांनी सुटसुटीत योजना आणण्याची गरज आहे. यानुसार पॉलिसीधारकांना योजनांची माहिती घटकन रामजेल. विमा पॉलिसीतील शब्द हे विमा कवच आणि अटीतील पारदर्शकता आणि स्पष्टता आणणारे असावेत. पॉलिसीधारकांच्या हिताचे संरक्षण व्हायला हवे. सर्व जोखमीसंदर्भात निश्चित करण्यात येणारे मूल्य योग्य असावेत.

■ हप्ता परवडणारा असावा

आरोग्य विमा योजनेचा हप्ता हा परवडणारा असावा, अशी अपेक्षा इर्डाने व्यक्त केली आहे. परवडणारा हप्ता असावा आणि यात सर्व जोखमीचा समावेश असेल, याबाबत दक्षता कंपन्यांनी घ्यावी. अनावश्यक योजना परत घेण्याचाही विमा कंपनीने विचार करावाल, असे इर्डाने म्हटले आहे.

■ कमाल वयाची अट काढली

आतापर्यंत विमा कंपन्यांना ६५ वर्षापर्यंतच्या व्यक्तीला नियमित आरोग्य विमा देण्ये बंधनकारक असायचे. परंतु आता नियमात बदल करत कमाल वयाची अट काढून टाकली आहे. त्यामुळे उच्च नागरिकांसाठी नव्याने विमा पॉलिसी बाजारात येतील. तसेच अधिक कस्टमाईज्ड आणि इनोव्हेटिव्ह हेल्थ पॉलिसी बाजारात येतील.

विमाजगत

उच्चांकासमीपची घुसळण

भारतीय शेअर बाजारात एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये निफ्टी५०, बँक निफ्टी, सेन्सेक्ससह निफ्टी फायनान्ससारख्या अनेक निर्देशांकांनी सार्वकालिक उच्चांकी पातळी गाठल्यानंतर भारतीय शेअर बाजार काहीसा सुस्तावलेला दिसून आला. तथापि, गेल्या आठवड्यामध्ये देशांतर्गत नोंदणीकृत कंपन्यांपैकी बढ्या कंपन्यांचे तिमाही निकाल जाहीर झाल्यामुळे आणि कोटक महिंद्रा बँकेवर आरबीआयने केलेल्या कारवाईमुळे बाजाराच्या निर्देशांकांमध्ये बरीच घुसळण दिसून आली.

तत्पूर्वी बाजारातील भीती दर्शवणारा व्होलॅटिलिटी इंडेक्समध्ये गेल्या पाच वर्षांतील सर्वात मोठी घसरण दिसून आली. याबाबत विश्लेषकांकडून वेगवेगळी मते व्यक्त केली गेली आहेत. आतापर्यंतची उपलब्ध माहिती पाहता, आतापर्यंत इंडिया व्हिक्सच्ये एकाच दिवसांत १५ टक्क्यांपेक्षा अधिक घसरण झाल्याच्या १४ प्रसंगांपैकी ९ घटनांमध्ये पुढील महिन्यात निफ्टी–५० ने सकारात्मक परतावा दिला आहे. याची निमांसा करताना दोन गोष्टींकडे जाणकार लक्ष वेधतात. एक म्हणजे पश्चिम आशियातील तणाव कमी होणे किंवा लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला पुन्हा मजबूत जनादेश मिळणे. मे २०१९ च्या सार्वत्रिक निवडणूक निकालांच्या घोषणेदरम्यान इंडिया व्हिक्सच्यमध्ये ३४ टक्क्यांची घसरण झाली होती, पण त्यानंतरच्या पुढील महिन्यात निफ्टीपेक्षा ५ टक्क्यांची वाढ दिसून आली होती. त्यामुळे येत्या काळात इंडिया व्हिक्सवर नजर ठेवून राहणे आवश्यक आहे.

गतसप्ताहामध्ये सेन्सेक्समध्ये ०.८७ टक्के म्हणजेच ६४१.८३ अंकांची वृद्धी झाली आणि ७३७३०.१६ वर बंद झाला. निफ्टीप० मध्येही गेल्या सप्ताहात १.२३ टक्क्यांनी म्हणजेच २७३ अंकांनी वधारून २२,४२० वर बंद झाला. स्मॉल कॅप, मिडकॅप निर्देशांकांमध्येही ४ टक्क्यांची वाढ झाली. लार्ज कॅप इंडेक्समध्ये १.५ टक्क्यांची वाढ झाली. निफ्टी मिडकॅप १०० इंडेक्समध्ये ४ टक्क्यांची वाढ होऊन ५०,६८४.५०

■ सेन्सेक्स	७३,७३०.१६ (–६०९.२८)
■ निफ्टी	२२,४१९.९५ (–१५०.४०)
■ बँक निफ्टी	४८,२९४.७० (–२००.२५)
■ फिन निफ्टी	२१,३८५.७५ (–१५९.६०)

गतसप्ताहातील शेअरच्या सत्राचे बंदपातळी भाव

नव्या सार्वकालिक उच्चांकी पातळीवर पोहोचला. शुक्रवारच्या सत्रात बाजारामध्ये घसरण झाली असली तरी अद्यापही तेजीचा माहोल कायम आहे. सद्यस्थितीत निफ्टी ५० ला २२,३०० च्या पातळीवर आधार दिसत आहे. तो न टिकल्यास २२,२०० ची भक्कम आधार पातळी आहे. ट्रेडर्सनी या दोन्ही पातळ्यांवर लक्ष ठेवून राहणे आवश्यक आहे. त्याआधारे बाय ऑन डिप्स ही रणनीती अवलंबता येईल. वरच्या पातळीवर विचार करता २२६२०–२२६३० पर्यंत निफ्टी येत्या काळात वधारून २२,७७६ हा आपला सार्वकालिक उच्चांक मोडण्याचीही शक्यता दिसत आहे. तसे न झाल्यास २२,०००ते २२,६०० या रेंजमध्ये निफ्टी फिरताना दिसू शकतो.

■ शेअर बाजार

गिफ्ट निफ्टीमध्ये ४८ अंकांची वाढ शुक्रवारच्या समाप्तीला झालेली दिसत आहे. त्यावरुन सोमवारी भारतीय बाजारांची सुरुवात सकारात्मक राहील असे दिसते. तथापि, सोमवारी अमेरिकेतील पीसीआयची आकडेवारी जाहीर होणार आहे. तसेच खासगी बँकांचे तिमाही निकाल जाहीर झाले असून त्याचेही पडसाद बाजारात उमटणार आहेत. आयसीआयसीआय बँक, आयडीएफसी फर्स्ट, पूनावाला फिनकॉर्प, ट्रेंड आदी कंपन्यांच्या तिमाही निकालांचे पडसाद बाजारात उमटतील. आयसीआयसीआय बँकेच्या शुद्ध नफ्यामध्ये १७ टक्क्यांची वृद्धी झाली आहे. आयडीएफसी बँकेच्या नफ्यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत जवळपास ७० कोटींहून अधिक घसरण झाली आहे.

विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून विक्रीचा मारा अद्यापही सुरू आहे. एप्रिल महिन्यामध्ये ६३०४ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली आहे. येत्या काळात एफआयआयची भूमिका काय राहते, यावर बाजाराची वाटचाल निर्भर राहील.

समभागांचा विचार करता सध्या बाजार उच्चांकी पातळीच्या समीप आहे. त्यामुळे दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी थोडे थांबून रुबाद्री मोठी घसरण झाल्यास संधी साधणे फायदेशीर ठरेल. सद्यस्थितीत इंडस्इंड बँकेच्या समभागात आणखी घसरण झाल्यास १३०० च्या पातळीवर खरेदी करुन १८५० रुपये लक्ष्य ठेवता येईल. दालमिया भारतचा समभाग ७७६० ला खरेदी करुन २३०० रुपये लक्ष्य ठेवता येईल. भारतीय एअरटेलचा समभाग १३०० रुपयांना खरेदी करुन १५७० रुपये लक्ष्य ठेवता येईल. बजाज फायनान्सच्या समभागात आणखी घसरण झाल्यास ६५०० रुपयांच्या पातळीवर थोडीशी जोखीम पत्करुन खरेदी करता येईल. रिलायन्स इंडस्ट्रीजचा समभागही पडझडीत खरेदी करता येईल. एसबीआय कार्डचा समभाग ७३० च्या आसपास खरेदी करुन ८०० ते ८२० रुपये लक्ष्य ठेवता येईल. वेदांताचा समभाग ४२५ रुपयांनां खरेदी करुन ४९० रुपये लक्ष्य ठेवता येईल. जीएमआर इन्फ्राचा समभाग १०० रुपयांचेलश ठेवून खरेदी करता येईल. हुडकोचा समभाग २४५ ते २५० रुपये लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. टीसीएसच्या समभागातही मोठी पडझड झाली आहे. ती तशीच सुरू राहिली तर ३७५० च्या पातळीवर या समभागाची खरेदी करता येईल आणि ४००० रुपये लक्ष्य ठेवता येईल.

बाजाराचा सध्याचा ट्रेंड पॉझिटिव्ह असला तरी उच्चांकासमीप असल्याने जोखीमही तितकीच आहे. तसेच भूराजकीय घटनांचे पडसादही झपाट्याने उमटत आहेत. त्यामुळे सेल ऑन राईज ही रणनीतीही महत्त्वाची आहे.

पालकांना द्या योजनांची भेट

वडिल, पालक हे आपल्या भविष्याला आकार देण्यासाठी सर्वांधिक योगदान देत असतात. परिणामी त्यांच्या वृद्धापकाळात मुलाने सांभाळ करणे आणि आधार बनणे हे स्वाभाविक आहे. पालकांना, ज्येष्ठ नागरिकांना शारिरीक अडचणींबरोबरच नियमित उत्पन्न नसल्याने वृद्धापकाळात अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. अशा स्थितीत आरोग्य विमा, आरोग्य तपासणी, ॲन्यूटी प्लॅन, इएलएसएस सारख्या महत्त्वाच्या योजनांच्या माध्यमातून आपण पालकांची काळजी घेऊ शकतो. यासंदर्भात माहिती घेऊ या.

■ आरोग्य विमा

आपल्या आई–वडिलांपैकी कोणाचाही आरोग्य विमा उतरवणे ही चांगली कृती आहे. आपल्कालिन स्थितीत त्यांच्यावरील उपचारासाठी हा विमा उपयुक्त ठरू शकतो. त्याचबरोबर विमाच्या बदल्यात आपल्याला ५० हजार रुपयांपर्यंत करसवलतही मिळते. प्राप्तीकर अधिनियम कलम ८० डी नुसार पालकांच्या आरोग्य विम्यावर पाल्यांस करसवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही सवलत कलम ८० सीमुळे मिळणार्या दीड लाख रुपयांच्या व्यतिरिक्त आहे. एकरकमी भरलेला आरोग्य विम्याचा हप्ता हा संपूर्णपणे करसवलत देणारा ठरतो. कुटुंबात वंशपरंपरागत आजार असेल तर विशेष आजारांशी निगडीत पित्याला विमा कवचही प्रदान करू शकतो.

■ टर्म प्लानचा खर्च उचला

टर्म विमाधारक व्यक्तीचा अकस्मात मृत्यू हा कुटुंबासमोर येणार्या आर्थिक अडचणी दूर करण्याचे काम करते. कोणताही पाल्य हा पित्याला आर्थिक मदत देऊन ही पॉलिसी देऊ शकतो. कर्करोग, हृदयाशी निगडीत आजारांशीसंबंधी पॉलिसी देखील उपलब्ध आहेत. त्याचा खर्च उचलत पित्याला आरोग्य सुरक्षा देता येते. विशेषत ज्यांना एकुलती एक मुलगी आहे त्यांच्यासाठी अशा प्रकारची पॉलिसी महत्त्वाची भूमिका बजावते.

■ ज्येष्ठ नागरिकांसाठीब बचत योजना

ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या बचत योजना देखील पित्यांसाठी चांगली भेट ठरू शकते. जर आपल्या पित्यास नियमित उत्पन्न नसेल तर त्यांच्यासाठी ही एक चांगली भेट अवू शकेल. आणण स्वत: गुंतवणूक करू शकत नाही, मात्र पित्याच्या नावाने गुंतवणूक करू शकता. यात त्रैमासिक व्याज हे पालकांना मिळत राहिल. त्याच्या मॅच्यूरिटीचा कालावधी हा पाच वर्षाचा असतो. त्यास पुढे तीन वर्षे वाढवू शकतो. पारंपारिक बचत योजनांच्या तुलनेत चांगले व्याज या बचत योजनावर मिळत आहे. ६० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाचा कोणताही व्यक्ती ज्येष्ठ नागरिकांच्या बचत योजनांना पात्र आहे. त्याचवेळी ५५ वर्षांपेक्षा अधिक आणि ६० पेक्षा कमी असणारी, त्याचबरोबर रिझाएस घेणारी मंडळी देखील बचत खाते सुरू कर शकतात.

■ गुंतवणूक

■ मुदत ठेवी, एनएससीसुद्धा करा

वडिलांच्या नावाने एफडी म्हणजेच एनएसी, केव्हीपी देखील करू शकता. एफडीमध्ये सात ते आठ टक्के व्याज आणि एनएससीमध्ये आठ टक्के व्याज दिले जाते. यात पाच वर्षासाठी सुरक्षित गुंतवणूक होते. जर खातेदाराला तराविक कालानंतर रक्कम हवी असेल तर अशा प्रकारची गुंतवणूक फायदेशीर आहे.

■ इएलएसएसमध्ये गुंतवणुकीचा पर्याय

जर आपण जोखीम उचलण्याची तयारी करत असाल तर वडिलांसाठी इक्विटी लिंक्ड सेव्हिंग योजना देखील निवडू शकता. हे आपल्याला करसवलतीचा लाभ देतात. त्याचबरोबर त्यात लॉक इन पीरियड हा केवळ तीन वर्षाचा आहे. अशा स्थितीत ही योजना खूपच लवचिक मानली गेली आहे. एवढेच नाही तर जीवन विमाच्या दृष्टीकोनातून यूलिप म्हणजेच यूनिट लिंक्ड इन्शूरन्स प्लॅन देखील पित्याशाठी निवडू शकतात.

■ आरोग्य तपासणी

जर आपले आई वडिल किंवा अन्य पालक आपल्या आरोग्यावरुन काळजीत असतील तर नियमितपणे हेल्थ चेकअप करुन त्यांची देखभाल करु शकता. यातून गंभीर आजाराचे तातडीने निदान होऊ शकते आणि आरोग्यावरचा संभाव्य अधिक खर्च कमी होऊ शकतो. त्याचबरोबर मात्या पित्यांना शस्त्रक्रिया किंवा अन्य अडचणीपासून वाचवता येते. जर आपल्या पालकांचे वय ६० पेक्षा अधिक असेल तर करसवलत ७ हजार रुपयांपर्यंत मिळते. त्यांना पॅमिली फ्लोटर प्लॅनमध्ये सहभागी करून आणंच सुरक्षा वकय प्रदान करू शकतो.

■ डिजिटल पेमेंट

सध्याच्या डिजीटल पेमेंटमुळे बिल भरणा खूपच सोपे आणि सुलभ झाले आहे. मात्र यापासून ज्येष्ठ नागरिक पारशी रुची दाखवत नाहीत आणि ते स्वत: बिल भरण्याबाबत आग्रही असतात. अशा पालकांना डिजिटल तंत्रावि आणि खात्याची माहिती देऊन त्यांना मदत करू शकतो. एखादा पाल्य अन्य शहरात आणि आईवडिल दुसर्या ठिकाणी असतील तर वीज, पाणी, गॅस, फोन बिल भरताना पालकांनं स्वत:च धावपळ करावी लागते. अशा स्थितीत पाल्य त्यांचे सर्व बिल त्यांच्या खात्याशी ऑटो पेशी जोडून त्यांना दिलासा देऊ शकतात. वडिलांचे कोणतेही कर्ज वेळा हप्ता हे वेळेच्या आधीच फेडण्यासाठी मदत करा.

■ प्रवासी विमा उपयुक्त

जर आपले आई वडिल आपल्यापासून दूर राहत असतील तर त्यांचा ट्रॅव्हल इन्शूरन्स देखील करू शकतो. जर रेल्वे स्थानकावर किंवा विमानतळावर पोचण्यास उशीर होत असेल, सामान चोरी होत असेल तर त्याची भरपाई मिळते. प्रवासादरम्यान कोणतेही मेडिकल इमर्जन्सी उद्भवल्यास आणि प्रकारचा विमा उपयुक्त ठरतो.

गुंतवणूक

निवृत्तीनंतर किती मिळणार पेन्शन?

प्रॉ फिडंट फंडाची रचना पाहिल्यास जर तुम्ही एखाद्या कंपनीत काम करत असाल तर दर महिन्याला तुमच्या पगारचाचा काही भाग पीएफ खात्यात जमा होतो. काही भाग तुम्ही जिथे काम करता त्या कंपनीद्वारे देखील योगदान दिले जाते. या जमा रकमेवर सरकारकडून काही व्याज दिले जाते. सध्या पीएफवर ८.२५ टक्के व्याज दिले जाते आणि. कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर ही रक्कम एकत्रितपणे मिळते. काही भाग दरमहा पेन्शनमध्ये जातो, जो निवृत्तीनंतर मिळू लागतो. किती पेन्शन मिळेल याची गणना ईपीएफइंडिया डॉट जीओव्ही डॉट इन या अधिकृत वेबसाइट वर उपलब्ध कॅल्क्युलेटरवरुन केली जाऊ शकते.

ईपीएफ ही ही बचत योजना आहे. ज्या कंपनीत कर्मचाऱ्यांची संख्या २० किंवा त्याहून अधिक आहे, त्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनाच हा लाभ मिळतो. याचे पर्यवेक्षण केंद्र सरकार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि दुसरा म्हणजेच कर्मचारी पेन्शन योजना.

नवं काही

पेन्शन मिळवण्यासाठी कर्मचाऱ्याचे पीएफ खाते १० वर्षे सक्रिय असणे आवश्यक आहे. येथे खाते सक्रिय करणे म्हणजे कर्मचाऱ्याचे १० वर्षांचे पेन्शन योगदान ईपीएफओमध्ये जमा केले जावे. जर एखाद्या कर्मचाऱ्याचे पेन्शन योगदान ९ वर्षे आणि ६ महिन्यांसाठी जमा केले असेल तर ते १० वर्षे राउंडिंग ऑफ मानले जाते. यामध्ये मूळ वेतनाच्या १२ टक्के रक्कम कर्मचाऱ्यांकडून जमा केली जाते. तर कंपनी मूळ वेतनाच्या ८.३३% ईपीएसमध्ये आणि ३.६७% मूळ वेतन ईपीएफच्ये जमा करते. त्याचा परिपक्वता कालावधी कर्मचाऱ्याच्या वयाच्या ५८ वर्षांपर्यंत आहे.

पीएफ खातेधाराकाचा मृत्यू झाल्यास त्याच्या जीवनसाथीला पेन्शनची रक्कम मिळते. जर पती/पत्नी नसेल तर मुलांना २५ वर्षांपर्यंत पेन्शन मिळते. जर लग्न झाले नसेल तर नॉमिनीला पेन्शन मिळेल. त्यामुळे पीएफ खात्यात नॉमिनीचे नाव नक्की टाका. आपण ते ऑनलाइन देखील जोडू शकता. नॉमिनी नसल्यास, कर्मचाऱ्याच्या पालकांना या पेन्शनचा हक्क आहे.

■ पेन्शन किती मिळेल हे जाणून घेण्यासाठी अधिकृत वेबसाइटवर जा. ह्र उघडलेल्या पृष्ठावर तुमची जन्मतारीख प्रविष्ट करा. यासोबतच जॉईन होणे आणि नोकरी सोडणे यासह आणखी काही माहिती द्यावी लागेल.

■ ह्र ही माहिती टाकल्यानंतर ॲड सर्व्हिसवर क्लिक करा.

■ ह्र आता शो/अपडेट/डिटेल्सवर क्लिक करा.

■ ह्र उघडणारे पृष्ठ तुम्हाला ५८ वर्षे पूर्ण झाल्याची तारीख, लवकर निवृत्तीवेतनासाठी ५० वर्षे वयाची गणना आणि निवृत्तीवेतन सुरू होण्याची तारीख दर्शवेल.

■ ह्र तुमची इच्छा असल्यास, तुम्ही वयाची ५० वर्षे पूर्ण केल्यानंतरही पेन्शनचा लाभ घेऊ शकता. अशा परिस्थितीत पेन्शनची रक्कम कमी होते हे येथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

■ ह्र आता पेन्शन कॅल्क्युलेटरमध्ये पेन्शन सुरू होण्याची तारीख आणि पेन्शन पगार प्रविष्ट करा आणि तपशील दर्शवा/अपडेट करा वर क्लिकका करा. यानंतर तुम्हाला दर महिन्याला मिळणारी पेन्शनची रक्कम दिसेल.

आ जरूया काळात कोणत्याही व्यक्तीला कधीही पैशांची गरज भासू शकते. अशा परिस्थितीत बँकेकडून कर्ज घेणे हा तुमच्या गरजा पूर्ण करण्याचा एक चांगला मार्ग आहे. त्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तुम्हाला कमी व्याजावर कर्ज सहज मिळू शकते. कमी व्याजावर कर्ज मिळविण्यासाठी, आपल्याला कही तारण द्यावे लागेल. जमीन गहाण ठेवून कर्ज घेणे हा सर्वात किफायतशीर मार्ग मानला जातो.

जाणून घ्या

■ जमीन ही एक मौल्यवान संपत्ती आहे. जमीन गमविर कर्ज कोणत्या कारणांसाठी घेतले जाऊ शकते ?

जमीन गहाण ठेवून, तुम्ही घर बांधण्यासाठी, वैयक्तिक कर्जाची परतफेड आणि व्यवसाय विस्तारासह इतर कारणांसाठी सहजपणे कर्ज घेऊ शकता. कर्ज घेण्यासाठी तुम्ही जमिनीचे मालक असणे आवश्यक आहे. यासोबतच सर्व प्रकारची कागदपत्रे पूर्ण असावीत.

■ रक्कम, व्याज दर आणि कार्यकाळ–

जमीन गहाण मिळालेल्या रकमेत अनेक घटक आहेत. जसे की तुम्ही जमिनीचा आकार किती आहे आणि जमीन कोणत्या ठिकाणी आहे. त्याचे मूल्यांकन करूनच बँक कर्ज देते. हे सुरक्षित कर्ज आहे. या कारणास्तव व्याज सहसा कमी असते. कार्यकाळबद्दल बोलायचे तर, तुम्ही तुमच्या गरजेनुसार कर्ज घेऊ शकता, ते काही महिन्यांपासून अनेक वर्षांपर्यंत असू शकते.

जमिनीवर कर्ज घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे ह्र

■ जमिनीची कागदपत्रे
■ आधार कार्ड
■ पगार स्लिप किंवा खळ
■ बँक स्टेटमेंट

■ जमिनीवर कर्ज घेताना या गोष्टी लक्षात ठेवा ह्र

जमीन गहाण ठेवून कर्ज घेतल्याने तुम्हाला पैसे मिळतात, पण त्यात खूप धोकाही असतो. नियामकाने केलेली कोणतीही कारवाई तुमच्या जमिनीच्या मूल्यावर परिणाम करते. बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे जमिनीची किंमत बदलत राहते. याशिवाय जर तुम्ही कर्जाचा हप्ता वेळेवर भरू शकला नाही तर तुमच्या जमिनीचा लिलावही होऊ शकतो. त्यामुळे जमीन गहाण ठेवून कर्ज घेताना ते महत्वाच्या कामासाठीच घ्या. मौजमजा करण्यासाठी कर्ज घेऊ नका. कर्जाचे हप्ते वेळेत भरा. कर्ज घेताना्या नियम व अटी काळजीपूर्वक वाचून त्याचे पालन करा. अनेकदा कर्जाची परतफेड न झाल्याने जमिनीचा लीलाव झाल्याच्या घटना आहेत. सर्व बाजूंनी विचार करुनच कर्ज घ्या.

प्रभाग क्र.१२ मध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ परिसरातून फेरी काढण्यात आली.

निलेश लंके यांना नगर शहरातून मोठे 'मताधिक्य' मिळवून देणार

संभाजी कदम यांचे प्रतिपादन; महाविकास आघाडीच्या प्रचारार्थ प्रभाग १२ मध्ये फेरी

नगर – सध्याचे सरकार हे घोषणाबाज असून, त्यांनी दिलेली आश्वासने या सरकारने पुर्ण केली नाहीत. महागाई, बेरोजगारी, शेतकर्यांचे प्रश्न अशा प्रत्येक आघाडीवर हे सरकार अपयशी ठरले आहेत. त्यामुळे या सरकारला आता जनसामान्यच या निवडणुकीत जागा दाखवून देणार आहे. महाआघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी कोरोना काळात केलेले कार्य सर्वांनीच पाहिले आहे. त्यामुळे जनसामान्य ते त्यांच्या पाठिशी उभे आहेत. गेल्या काही दिवसापासून प्रचारात मोठी आघाडी घेतली असून, नागरिकांमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे. सध्याच्या खासदारांनी नगरमध्ये कोणत्याही प्रकारची कामे केली नसून, नगरमधील प्रश्नांवर बोलण्याऐवजी इतरच लक्ष वेधून जनतेची दिशाभुल करत आहेत. परंतु जनता त्यांच्या भुलथापांना बळी पडणार नाहीत. मोठ्या बहुमतांनी निलेश लंके हे निवडून येतील, असा विश्वास शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम यांनी व्यक्त केला.

प्रभाग क्र.१२ मध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ परिसरातून फेरी काढण्यात आली. याप्रसंगी शिवसेना (ठाकरे गट) शहरप्रमुख संभाजी कदम, नगरसेवक बाळासाहेब बोरोटे, माजी महापौर कावरे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, युवा सेना सहसचिव विक्रम राठोड, संजय शेंडगे, गिरिष जाधव, शाम नळकांडे, अरुणा गोयल, अशोकराव बाबर, संतोष गेनप्पा, दिपक खेरे, सुरेश तिवारी, दिलदारसिंग बीर, परेश लोखंडे, योगिराज गाडे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, अरुण झेंडे, श्रीकांत चेमटे, मुन्ना भिंगारदिवे आदि उपस्थित होते.

यावेळी बाळासाहेब बोरोटे म्हणाले, नगर शहरातून निलेश लंके यांना मोठे मताधिक्य देण्यासाठी शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस एकत्रित प्रयत्न करत आहे. महाविकास आघाडीच्या मागे जनमत असल्याने निलेश लंके हे विजय होणार आहेत, त्यात नगर शहराचा मोठा वाटा असेल. मतदारांनी ही स्वत: निवडणुक हाती घेतली असल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळे बेताल व्यक्त करत आहे. त्यांचा पराभव जनताच करेल, असे सांगितले.

ही फेरी श्री विशाल गणेश मंदिर, ढोर गल्ली, वसंत टॉकीज चौक, कोठीची तालिम, पंचपीर चावडी, फुलसौंदर चौक, आशा टॉकीज चौक, जुना बाजार, बंगाल चौकी मार्गावरुन काढण्यात आली.

सुरेखा कदम, माजी नगरसेविका मंगल लोखंडे, दत्ता पोपट नगरे, विठ्ठल लोखंडे, आदीराज गवळीवाडा, पटनावर समाज, वाल्मीक समाज, ज्येष्ठ नागरिक संघ भिंगार उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीमध्ये विरोधकांकडून देशाच्या प्रश्नावर चर्चा होताना दिसत नाही. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना दिसत आहे. शरद पवार हे लोकसभेच्या दहा जागा लढवणारे राष्ट्रीय अध्यक्ष असून. उद्धव ठाकरे यांच्याकडे पक्षच राहिला नाही ही मंडळी देशाला स्थिरता देऊ शकत नाही. आधी आपले पक्ष सांभाळा मोदींच्या हाती सत्ता दिली म्हणजे देश सुरक्षित राहिला जातो. समान नागरी कायदा करण्यासाठी देशातील नागरिकांची मागणी असून १३ मे रोजी शिक्कामोर्तब करायचा आहे. देशात आपलेच सरकार येणार आहे प्रखर हिंदुत्ववादी पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांची ओळख आहे. डॉ. सुजय विखे यांना जे मतदान करणार ते हिंदुत्वाला आणि नरेंद्र मोदी यांना असेल. भिंगार शहर हे प्रखर हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे गाव आहे विरोधी पक्षाकडे नेता नाही केंद्र सरकारने ३७० कलम रद्द केल्यानंतर भारतवासीयांनी मोठे स्वरूपात स्वागत केले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्व समावेशक निर्णय घेतले जातात. कोरोनाच्या काळात केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेला खऱ्या अर्थाने दिलासा देण्याचे काम केले आहे. लोकसभेची निवडणूक ही मनपा, कॅन्टोन्मेंटची नसून देशाची सुरक्षा कोणाच्या हाती द्यायची आहे यासाठी आहे मंदिरे उभे करणे हा आमचा मुख्य अजेंडा आहे असे ते म्हणाले

अभय आगरकर म्हणाले की, भिंगार हे गाव नेहमीच भाजप शिवसेना बरोबर राहिले आहे. कॅन्टोन्मेंट हद्दीमध्ये हे गाव येत असल्यामुळे विविध प्रश्न प्रलंबित असून ते सोडवण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. गवळी समाजाचा स्मशानभूमीचा प्रश्न निवडणुकीनंतर नक्कीच मार्गी लावला जाईल. भिंगार शहराचे एक एक प्रश्न हाती घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सोडवले जाईल असे ते म्हणाले.

यावेळी भिंगार मधील नागरिक उपस्थित होते. महेश नामदे यांनी आभार मानले.

भिंगारमध्ये मतदारांशी संवाद साधताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. (छाया – लहू दळवी)

ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा भिंगार शहरवासियांशी 'संवाद'

नगर – नगर दक्षिण लोकसभेचे भाजप महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भिंगार शहरवासीयांशी संवाद साधला. यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, वसंत लोढा, संजय सपकाळ, नरेश चव्हाण, महेश झोडगे, संजय छजलानी, महेश नामदेव, वसंत राठोड, नामदेव लंगोटे, ठकाप्पा लंगोटे, स्मिता अष्टेकर, सचिन जाधव, पोपट पाथरे, आनंद शेळके, सुभाष घोडके, रवींद्र जेवरे, रवींद्र दुगम, पोपट नगरे, विठ्ठल लोखंडे, आदीराज गवळीवाडा, पटनावर समाज, वाल्मीक समाज, ज्येष्ठ नागरिक संघ भिंगार उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीमध्ये विरोधकांकडून देशाच्या प्रश्नावर चर्चा होताना दिसत नाही. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना दिसत आहे. शरद पवार हे लोकसभेच्या दहा जागा लढवणारे राष्ट्रीय अध्यक्ष असून. उद्धव ठाकरे यांच्याकडे पक्षच राहिला नाही ही मंडळी देशाला स्थिरता देऊ शकत नाही. आधी आपले पक्ष सांभाळा मोदींच्या हाती सत्ता दिली म्हणजे देश सुरक्षित राहिला जातो. समान नागरी कायदा करण्यासाठी देशातील नागरिकांची मागणी असून १३ मे रोजी शिक्कामोर्तब करायचा आहे. देशात आपलेच सरकार येणार आहे प्रखर हिंदुत्ववादी पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांची ओळख आहे. डॉ. सुजय विखे यांना जे मतदान करणार ते हिंदुत्वाला आणि नरेंद्र मोदी यांना असेल. भिंगार शहर हे प्रखर हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे गाव आहे विरोधी पक्षाकडे नेता नाही केंद्र सरकारने ३७० कलम रद्द केल्यानंतर भारतवासीयांनी मोठे स्वरूपात स्वागत केले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्व समावेशक निर्णय घेतले जातात. कोरोनाच्या काळात केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेला खऱ्या अर्थाने दिलासा देण्याचे काम केले आहे. लोकसभेची निवडणूक ही मनपा, कॅन्टोन्मेंटची नसून देशाची सुरक्षा कोणाच्या हाती द्यायची आहे यासाठी आहे मंदिरे उभे करणे हा आमचा मुख्य अजेंडा आहे असे ते म्हणाले

अभय आगरकर म्हणाले की, भिंगार हे गाव नेहमीच भाजप शिवसेना बरोबर राहिले आहे. कॅन्टोन्मेंट हद्दीमध्ये हे गाव येत असल्यामुळे विविध प्रश्न प्रलंबित असून ते सोडवण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. गवळी समाजाचा स्मशानभूमीचा प्रश्न निवडणुकीनंतर नक्कीच मार्गी लावला जाईल. भिंगार शहराचे एक एक प्रश्न हाती घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सोडवले जाईल असे ते म्हणाले.

यावेळी भिंगार मधील नागरिक उपस्थित होते. महेश नामदे यांनी आभार मानले.

भिंगारमध्ये मतदारांशी संवाद साधताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. (छाया – लहू दळवी)

अवैधरित्या रिफिलिंगसाठी चालविलेल्या ६० गॅस टाक्या पकडल्या सर्जेपुरा–रामवाडी रोडवर पोलिसांची कारवाई

नगर – अवैधरित्या रिफिलिंग साठी चालविलेल्या ६० गॅस टाक्या घेवून जाणारा टेम्पो तोफखाना पोलिसांनी पकडला आहे. शहरातील सर्जेपुरा ते रामवाडी जाणाऱ्या रोडवर रविवारी (दि.२८) ६.३५ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालणाऱ्या पथकाला सर्जेपुरा ते रामवाडी जाणाऱ्या रोडवर ६० गॅस टाक्या घेवून जाणारा टेम्पो दिसला. पोलिसांना या टेम्पो बाबत संशय आल्याने त्यांनी टेम्पो थांबवून चौकशी केली असता टेम्पो चालकाकडे कुठलीही परवानगी आढळून आली नाही. त्याच्या कडे सखोल चौकशी केल्यावर त्याने अवैधरित्या रिफिलिंग साठी या गॅस टाक्या चालविल्याअसल्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून टेम्पो तसेच त्यातील भारत गॅस कंपनीच्या २४ भरलेल्या टाक्या, एच पी कंपनीच्या ३६ रिकाम्या घरगुती गॅस टाक्या असा सुमारे ३ लाख ३४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. टेम्पो चालक आशुतोष रोहिदास मोकाटे (रा. भाकरे गल्ली, सर्जेपुरा) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निर्भय, निष्पक्षपणे लोकसभा निवडणूक पार पाडा

रविकुमार अरोरा यांच्या सूचना; निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निरीक्षक यांची मनपात बैठक

नगर – १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी १०० टक्के मतदान घडवून आणण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करा, तसेच मतदान केंद्रावर मतदारांसाठी सुविधा उपलब्ध करून द्या, निर्भय, निष्पक्षपणे लोकसभा निवडणूक पार पाडा अशा सूचना यावेळी निवडणूक निरीक्षक रविकुमार अरोरा यांनी दिल्या.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहमदनगर मनपा हद्दीतील लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक निरीक्षक रविकुमार अरोरा यांनी मनपात बैठक घेतली. यावेळी आयुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, उपायुक्त सपना वसावा, शहर अभियंता मनोज पारखे, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे आदी उपस्थित होते.

महापालिकेत आयोजित बैठकप्रसंगी निवडणूक निरीक्षक रविकुमार अरोरा, आयुक्त डॉ. पंकज जावळे आदी. (छाया – लहू दळवी)

यावेळी आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी बैठकीत सांगितले की मनपा हद्दीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करावी, याचबरोबर जनजागृतीचा रथ शहरात फिरत आहे, पथनाट्य, विविध संघटना, बचत गट यांद्वारे मतदानासाठी जनजागृती करण्यात आली. लोकसभा निवडणुकीसाठीची तयारी अहमदनगर मनपा हद्दीत जोरदार सुरु आहे. अशी माहिती त्यांनी दिली

पंकज जावळे, अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी, उपायुक्त

गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्याविरोधात आमरण उपोषण

जिल्हाधिकारी यांना शरद क्यादर यांचे निवेदन

नगर – गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिराचे भूमिपूजन बेकायदेशीरपणे ८ ते १० मे रोजी होणार असून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे याचबरोबर देशात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक पार पडत असून १३ मे रोजी नगर दक्षिण लोकसभेचे मतदान केंद्र क्रमांक १६१ व २८६ आहे तरी बेकायदेशीरपणे होणारे भूमि पूजन कार्यक्रम थांबवा अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांना शरद क्यादर यांनी दिला आहे

निवेदनात शरद क्यादर पुढे म्हणाले की गांधी मैदान येथील मार्कंडेय मंदिर देवस्थान ही नोंदणीकृत धार्मिक न्याय संस्था असून मार्कंडेयचे दगडी मंदिर असून समा मंडप व तारी बाजूंनी संरक्षण भिंत आहे. सदरच्या देवस्थानवर कोर्टाच्या घटनेप्रमाणे कोणीही कायदेशीर विश्वस्त राहिले नाही यापूर्वी ट्रस्ट संस्थेच्या नावाने नवीन विश्वस्त निवडून आल्याबाबत उपधर्मादाय आयुक्त कार्यालय अहमदनगर या ठिकाणी दाखल झाले होते, सदर बेकायदेशीरपणे विश्वस्त निवडीला मी हरकत घेतली होती त्यानुसार धर्मदाय आयुक्त कार्यालय अहमदनगर यांनी हा अर्ज खोटं व बेकायदेशीर असल्यामुळे विश्वस्त मंडळाची निवड रद्द करण्यात आलेली आहे.

तरी गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिराचे बेकायदेशीर होणारे भूमिपूजन थांबवा अन्यथा उपोषण करण्याचा इशारा शरद क्यादर यांनी दिला आहे.

'भाजप हटाव, देश बचाव' चा नारा देत जनविरोधी सरकारचा पराभव करावा

महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी भाकप सरसावले; जिल्हा कौन्सिलच्या बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सूचना

नगर – भारतीय कम्युनिस्ट पक्षाची जिल्हा कौन्सिलची बैठक जेष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ. श्रीधर आदिक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बुरुडगाव रोड येथील पक्षाच्या जिल्हा कार्यालयात झालेल्या या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे नगर दक्षिणचे उमेदवार निलेश लंके व शिर्डी लोकसभेचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांना सक्रिय पाठिंबा देण्यात आला. तर जनविरोधी सरकारचा पराभव करण्यासाठी भाजप हटाव देश बचावचा नारा देऊन जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या उमेदवारांच्या प्रचारार्थ सूचना करण्यात आल्या.

बैठकीत मार्गदर्शन करताना भाकपचे पदाधिकारी.

या बैठकीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. अॅड. सुभाष लांडे, जिल्हा सेक्रेटरी कॉ. डॉ. बन्सी सातपुते, जिल्हा सहसेक्रेटरी कॉ. अॅड. सुधिर टोकेकर, कॉ. कारभारी उगले, कॉ. बाबा आरगडे, कॉ. लक्ष्मण नवले, कॉ. बापूराव राशिनकर, कॉ. पांडुरंग शिंदे, कॉ. संतोष खोडदे, कॉ. संजय नांगरे, कॉ. सतिश पवार, कॉ. भारती न्यालपल्ली, कॉ. सुरेश पानसरे, कॉ. प्रताप सहाने आदी उपस्थित होते.

कॉ.अॅड. सुभाष लांडे म्हणाले की, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने या पूर्वीच भारतीय जनता पक्षाचे जनविरोधी सरकारचा पराभव करण्यासाठी भाजप हटाव देश बचाव जनजागरण मोहीम हाती घेतली होती. आयटक कामगार संघटनेच्या वतीने कोल्हापूर ते नागपूर महासंघर्ष यात्रा काढून भाजपच्या कामगार शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध करून ३४ जिल्ह्यातून महासंघर्ष यात्रा काढून नागपूर हिवाळी अधिवेशनावर ६० ते ७० हजार कामगार कर्मचाऱ्यांनी महामोर्चा काढला होता. नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षांच्या कार्यकालात २०१४ ला दिलेले एक ही आश्वासन पूर्ण झाले नसून, उलट शेतकरी व कामगार विरोधी धोरण घेऊन कार्पोरेट धार्जिणे धोरणे घेऊन अदानी, अंबानी यांच्या हितासाठी सार्वजनिक उद्योग खाजगी करून महागाई वाढविण्यात आली आहे.

कॉ. अॅड. बन्सी सातपुते म्हणाले की, दरवर्षी दोन कोटी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याऐवजी खाजगीकरणामुळे रोजगार गेले आहेत. जीएसटीमुळे शेतकरी व सर्वसामान्यांचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे. स्वामि नाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारून शेतकऱ्यांना हमी भाव देण्याचे आश्वासन पाळले नाही, त्यामुळे शेतकरी कायमच कर्जबाजारी झाला आहे. याकडे मोदी सरकारने दुर्लक्ष करून शेती धोक्यात आली आहे. त्याचप्रमाणे लवूून मिळवलेले कामगार कायदे रद्द करुन उद्योगपतींना हवे तसे कायद्यांत बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे कामगार असुरक्षित असून, नोकरी टिकविणे कठीण झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कॉ. अॅड. सुधिर टोकेकर म्हणाले की, कामगार कायदे बदलू पाहणारे भाजप सरकारला कामगार वर्गाने त्यांना त्यांची जागा दाखवूून द्यावी. नवीन कामगार कायदे लागू झाल्यास कामगार वर्गाना बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. भांडवलदारांचे हित साधणारे कायदे असून, हे सरकारच भांडवलदारांचे आहे. हे सरकार उलथविण्याचे काम सर्वसामान्यांना करावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य कामगार व शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आणून त्यांना लोकसभेत पाठविण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष राक्रीय झाले असल्याचे जाहीर करण्यात आले. तर गाव पातळीवरील कार्यकर्त्यांना यावेळी सूचना करण्यात आल्या.

नगर शहरातील कचऱ्याबाबत निलेश लंकेंची थेट मोदींकडे तक्रार

ऑनलाईन तक्रारीत वाचला शहरातील अस्वच्छतेचा पाढा

नगर – लोकसभेचे महाआडीचे उमेदवार निलेश लंके यांनी नगर शहरातील उघड्यावरील कचरा व ठिकठिकाणच्या दुर्गंधीबाबत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे तक्रार केली आहे. केंद्र सरकारच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्मस्‌ एन्ड पब्लीक ग्रीएव्हेन्सेस्सच्या नोडल एजन्सीकडे लंके यांनी ऑनलाईन तक्रार नोंदवली आहे.

या तक्रारीत निलेश लंके यांनी म्हटले आहे की, नगर शहरात नागरिकांशी संवाद साधत असताना त्यांची शहरातील रस्त्यांवरील व खुल्या जागेवरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यांबाबत, कचरा गाडी वेळेवर न येणे, अस्वच्छता व दुर्गंधी बाबत नागरिकांची तक्रार आहे. नागरिकांनी व नगरसेवकांनी वेळोवेळी नगर महानगरपालिकेच्या आयुक्तांना व प्रशासनाला याबाबत तक्रार केली आहे. तरी त्यांच्याकडून याबाबत काही ठोस कारवाई झाली नाही. या समस्यामुळे शहरात अस्वच्छता, दुर्गंधी व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रशासनावर योग्य ती कारवाई करावी. लंके यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडे शहरातील अस्वच्छतेबाबत थेट तक्रार केल्याने याची नागरिकांमध्ये चर्चा सुरु आहे.

तक्रारीची केंद्राकडून दखल, चौकशीचे दिले आदेश

निलेश लंके यांनी नगर शहरातील अस्वच्छतेबाबत केंद्राकडे तक्रार केल्यानंतर त्याची तातडीने दखल घेण्यात आली. केंद्र सरकारने राज्य सरकारच्या उपसचिव रोशनी दिनेश कदम पाटील यांना याप्रश्नी चौकशी करून कारवाई करण्याचे आदेशीत केले आहे.

जागा खाली करण्यासाठी केडगावमध्ये व्यावसायिकाला मारहाण; गुन्हा दाखल

कार्यालयातील टेबल, खुर्च्या, सीसीटीव्हीची ही केली तोडफोड

नगर – जागा खाली करण्यासाठी व्यावसायिकाला तिघांनी मारहाण केली. त्यांच्या कार्यालयातील सामानाची तोडफोड करून ते बाहेर फेकून दिल्याची घटना केडगाव उपनगरातील भूषणनगरच्या राधेश्याम चौकात घडली. याप्रकरणी राजेंद्र मोहनराव पठारे (वय ४३, रा. दत्त चौक, भूषणनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजु भाऊसाहेब सातपुते, विजु भाऊसाहेब सातपुते, गुंफाबाई भाऊसाहेब सातपुते (सर्व रा. रंगोली हॉटेलच्या शेजारी, भूषणनगर, केडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. शुक्रवारी (दि. २६) सकाळी राजु सातपुतेसह तिघांनी पठारे यांच्या तीरूपती डेव्हलपर्स नावाच्या कार्यालयात प्रवेश केला. तुम्हाला सांगूत देखील जागा खाली का करत नाहीत. तुम्हाला एकदा सांगितलेले समजत नाही का असे म्हणून फिर्यादी राजेंद्र यांचा भाऊ विजय पठारे यांना शिवीगाळ व लाथाबुक्कयांनी मारहाण करून त्यांच्या कार्यालयातील खुर्ची व इतर सामानांची तोडफोड करून बाहेर फेकून नुकसान केले आहे. कार्यालयातील सीसीटीव्ही तोडून तुम्ही जर कार्यालय खाली केले नाही तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, आम्ही तुमच्यावर खोटया केसेस दाखल करून जेलमध्ये घालू अशी धमकी दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस अंमलदार वाय. डी. कवाडे अधिक तपास करत आहेत.

लोकसभेत सुशिक्षित खासदार म्हणून डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठवू

धनश्री विखे पाटील यांचे प्रतिपादन; श्री देवांग पंच कोष्टी समाज नालेगाव यांचा पाठिंबा

नगर – नगर शहर वासियांचा अनेक वर्षाचा पाण्याचा प्रश्न सा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी मार्गी लावला आहे. केंद्र सरकारची अमृत पाणी योजना रखडली होती मात्र पाठपुराव करून योजना पूर्ण केली आणि नगरकरांना पूर्ण दाबाने पाणी दिले. सर्वसामान्य नागरिकांना डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले आहे. आपल्या सर्वांना लोकसभेमध्ये सुशिक्षित खासदार म्हणून डॉक्टर सुजय विखे पाटील यांना पाठवायचे आहे. नगर जिल्ह्यामध्ये तीन एमआयडीसी मंजूर झाल्या असून या माध्यमातून युवकांना रोजगार निर्मिती होईल. त्याची योजनेच्या माध्यमातून मरजू रुग्णांना मोफत लाभ मिळाला आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केलेल्या कामाची जाहिरात केली नाही असे प्रतिपादन धनश्री विखे पाटील यांनी केले.

नालेगाव येथील श्री देवांग पंच कोष्टी समाज यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला. याप्रसंगी सौ. धनश्री विखे पाटील. (छाया – लहू दळवी)

नगर दक्षिण लोकसभेचे भाजप महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांना नालेगाव येथील श्री देवांग पंच कोष्टी समाज यांनी जाहीर पाठिंबा दिला असून यावेळी धनंजय जाधव, अजय चितळे, सोनाली चितळे, उदय अनभुले, गणेश शिंदे, प्रफुल्ल लाटणे, अशोक फलके, रुपेश मोकोटे, सागर दळवे, सुभाष पाखले, संजय भंडारी, संतोष टेके, नितेश वराडे,उमेश टेके, गणेश लाटणे, रविंद्र टकले, सुरेंद्र असलकर, गणेश कांबळे, विजय खटावकर, पूजा दळवे, सुप्रिया पाखले, रुपाली मुकोटे, जयश्री लाटणे, सुनीता टेके, उज्वला टकले, सीमा लोटके, अंबिका टेके आदी उपस्थित होते.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी नगर शहर सुरक्षित राहावे यासाठी विविध भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले. कोरोना काळामध्ये केलेल्या कामाची सुजय विखे पाटील यांनी जाहिरात केली नाही मात्र ते आज आपल्याला कामाच्या माध्यम ातून सर्वत्र दिसत आहेत असे मत अजय चितळे यांनी व्यक्त केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष धंदनाल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले

12 एकर शेत जमीन त्वरित विकणे आहे

अहिल्यानगर शहरापासून, २२ किलोमीटर अंतरावर, चिचोंडी पाटील गावच्या हद्दीत, नगर-मनमाड रोड पासून ५०० मीटर अंतरावर असलेली

एकुण १२ एकर, पाण्याची सोय असलेली शेत जमीन
प्रति एकर : २२ लाख रु. प्रमाणे
(एजंट क्षमस्व.)
संपर्क : सिंह सर
8855810685

1/2 BHK फ्लॅट त्वरित भाड्याने पाहिजे

एरिया नवीपेठ, बाजारपेठ, खिस्तगल्ली
9834160745
9403934872

2 BHK फ्लॅट भाड्याने देणे

मार्केटयार्ड, सारसनगर येथे प्राईम लोकेशनला असलेला सुविधांयुक्त 2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
9049582465

मुलगा पाहिजे

१ जागा
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक (टू-व्हिलर आवश्यक आवश्यक)
शिक्षण : डिप्लोमा इन सिव्हिल किंवा कोणत्याही शाखेचा पदवीधर
9860604363

नामांकित कोचिंग क्लासेस करिता पाहिजेत

अ.नं.	पदाचे नाव	शैक्षणिक पात्रता	पदसंख्या
१	शिक्षक Physics	B.E / Msc	१
२	शिक्षक Chemistry	B.E / Msc	१
३	शिक्षक Biology	M.Sc	१
४	रिसेप्शनिस्ट	१२ वी	२

११ वी / १२ वी सायन्स NEET / CET
संपर्क : मो. 9356609460 / 8830043756

प्लॉझ आणि हार्डवेअर दुकानाकरीता पाहिजेत

कामगार
: २ जागा
अनुभवीस प्राधान्य
आर.के. एन्टरप्राईजेस
९२, वसंतदेव आर्केड शेवंडेर, माऊली सभुल्ल समोर, नगर-मनमाड रोड, साखडी, अ.नगर
8888803332

Required in Nagar MIDC

Office Executive
(M/F)- 02 posts
B.com/BSc/BE/BBA/MBA
(Exp. Min 1 year)
Salary: Rs.14000 to 16000
Whatsapp -
93 59 00 19 82

गाळे भाड्याने देणे

सोनोग्राफी सेंटर, क्लिनिक, बँक, पतसंस्था, ऑफिस इतर व्यावसायाकरिता भाड्याने देणे आहे. (श्री. दत्त मंदिराशेजारी) बुरुडगाव रोड, अ.नगर
9764752222
8888382444

भाड्याने/विकणे

बिल्डींग ३४५० स्क्वे.फू. बांधकाम, ग्राऊंड + ३ मजले, चार मागसांची लिफ्ट फर्निचरसह
सिटी पोलिस स्टेशन, नव्ही रेवाजाजवळ, अ.नगर
98228 55129

गाळा भाड्याने देणे

न्यू टिळक रोड येथे २२५० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे.
7757863333

पाहिजेत

ऑफिसबॉय(M)
दहावी पास, स्वतःची टू-व्हिलर आवश्यक, नगर शहराची माहिती आवश्यक
अर्जासह सकाळी ११ ते ५ बेळेत भेटावे.
CLASSIC GROUP OF COMPANY
५५२, शांती सदन, तोफखाना, अहमदनगर
मो. 92255 85508

होजिअरी व कापड क्षेत्रातील अग्रगण्य शोरूमसाठी हवे आहेत.

अकौंटंट (महिला/पुरुष)
कॉम्प्युटर टॅली सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक. इंझजी टायपिंग व अकौंटींग क्षेत्रात काम केल्याचा किमान २ ते ३ वर्षे अनुभव आवश्यक.
अनुभवीना प्राधान्य । आकर्षक पगार
इच्छुकांनी अर्ज-बायोडाटासह सायं. ४ ते ७ यावेळेत समक्ष संपर्क साधावा.
भाग्योदय | एम.जी. रोड, अहमदनगर -414001. ☎ 0241-2343466 94 2223 83 66

एमआयडीसी, अहमदनगर येथील नामांकित कंपनीसाठी पाहिजेत

- सीएनसी ऑपरेटर : १० ☆ व्हीएमसी : १०
- ऑपरेटर : ५० (१०-१२ वी पास)
- प्रॉडक्शन सुपरवायझर : ०२ (बी.ई.) इलेक्ट्रीक आणि मेकॅनिकल डिप्लोमा डिग्री
- क्वॉलिटी सुपरवायझर : ०२

8530973949, 9284039694

कापड बाजार येथे फक्त ७ हजारात द.म. गाळे भाड्याने उपलब्ध.

- अधिक माहितीसाठी संपर्क -
जय शंकर मार्केट
कापडबाजार अ.नगर
9270570699

टाटा एस पेट्रोल २०२३ ची गाडी विकणे आहे.

7887664417

रेडिमेड कापड दुकानात पाहिजेत

- सेल्समन : ५ जागा
- सेल्सबॉईज : ५ जागा

अनुभवीना प्राधान्य
: अर्जासह समक्ष भेटा :
बेस्ट युनिफॉर्म्स
कैलास डेअरीच्या खाली, चर्चरोड, अहमदनगर

पाहिजेत

- सेल्समन - जागा ४
- सेल्सगर्ल - जागा ४
- अकौंटंट - जागा २
- सोशल मिडिया हॅण्डलर - जागा २

अर्जासह समक्ष भेटा. । अनुभवींना प्राधान्य
SK सिमरतमल कुंदनमल
ज्वेलर्स
हसगुलाब, एम.जी. रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : ०२४१-२३२९००, २३२६००

पाहिजेत

अहमदनगर येथील नामांकित उद्योगसमुहाकरीता खालील हुशार व होतकरुची आवश्यकता आहे

डिस्पॅच एक्झीक्युटिव्ह | जागा 01 पुरुष

कॉम्प्युटर व बेसिक एक्सलचे ज्ञान आवश्यक. अनुभवींना प्राधान्य.
इच्छुकांनी खालील पत्त्यावर आपल्या संपूर्ण तपशिलासह अर्ज करावेत अथवा संपर्क साधावा

अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड
बी.झेड. सारडा
श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, श्रीराम मेडिकलच्या वर, सावेडी, अहमदनगर. मो. 7972731532
E-mail : gcbangr@rediffmail.com

शिबीर । शिबीर ।। शिबीर ।।।

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

नगरमध्ये प्रथमच जपानच्या अत्याधुनिक निहॉन कोडेन मशिनवरील EMG, EEG, NCV, VEP तपासणी शिबीर
कालावधी : १ मे २०२४ पर्यंत..
५० टक्के तपासणीत सवलत
संपर्क साधा.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136

गाळा भाड्याने देणे

अ.नगर मधील मार्केटयार्डमध्ये ६०५ स्क्वे.फूट पीओपी केलेल्या दुसऱ्या मजल्यावरील गाळा भाड्याने देणे आहे.
9579077370

फुलफर्निश 2 BHK फ्लॅट विकणे आहे

सावेडीमधील प्राईम लोकेशन, एकवीरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी, अ.नगर
9423792772

greenlibrary.in

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Bring Nature's Serenity Home.
Get Live Indoor Plant Today !
Indoor Plants | Self Watering | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, Ahmednagar - 414003
Amit Ajay Sankleche 99231 43334

शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस

नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन



दरमोज
- नगर वेळुन सं. ७,८,९ व दुपारी ९.०० ■ पुणे वेळुन स. १३,१५,५ व सायं.५ पा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
किफायत पॉईंट - पिंपलगाव फाटा, प्रोव्हो कॅन्टीन, साकुर, पिंप्रीले, राव सेल फोन,नागरीदेव फाटा,केडगाव
पुणे प्रवेश - सावेडी, कल्याणी सावत्रा, वेताळा, नवीन विश्रांतीभवन बसस्टॉपवर
बुकिंग आपल्या घरुन
अमर-प्रेम हॉलिडेज
अमित्रिय- सिद्धार्थ अ.नगर
9657746555/ 9226399555

केदारनाथ धाम दर्शन

५ रात्री / ६ दिवस | रेल्वे प्रवास । बस प्रवास । भोजन
दिनांक : १५/०६/२०२४ | निवास इ. व्यवस्थे सह
प्रति व्यक्ति - 9501/-₹ | 3AC- 11501/-₹

अमर प्रेम हॉलिडेज
ट्रेव्ह ऑफिसर - श्री. सचिन एकनाथराव महाजन / श्री. सतीश सचिन महाजन
पुलिस बीकनरोड, सिव्हिल रोड, अ.नगर मो. ९३२६२९९९९ / ९८५७७४९५९९ Holidays & Multiple Services
पुणे ऑफिस - श्री. गणेश बाळासाहेब कदमजी चौकशी: सिव्हील परीक्षणासाठी बाबाजाने संपर्क करावा. मो. ९७८८०५९९९ / ९८९९२२७७१
परिक्षा ऑफिस - श्री. कमेश गवळी मोबाईल नं. ७, सर्वोदय रोड, अशोक नगर/सावेडी नगर परिक्षा रोड, परिक्षा
जयपुर ऑफिस - श्री. कुलदीप झालावाडे मोबाईल नं. ४२, सर्वोदय रोड, अशोक नगर/सावेडी नगर परिक्षा रोड, अशोक विहार कॉलोनीजवळ, जयपुर मो. ९४१४०४९९९

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की, डि अहमदनगर सब डि तालुका नगर पैकी अहमदनगर महानगर पालिका हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब अहमदनगर यांचे कोर्तील खजुर गल्ही भागातील सिटी सर्व्हे नं ३४०१ ब्लु घर नंबर ३७४७, ३७४८, ३७५९ हे क्षेत्रफळ ३७९.६ चौ. मी. असुन सदर मिळकती पैकी आमचे अशिल विजय दत्तात्रय सरोदे यांनी दिनांक २४/६/२०९६ रोजी खरेदीखत दस्त नं. ३६३१/२०९६ अन्वये २०९.०४ चौ. मी. क्षेत्र नोदणीकृत खरेदीखताने विकत घेतलेले आहे. त्यामाणे आमचे अशिल यांचे नाव देखील सिटी सर्व्हे मिळकतीस लागलेले आहे. परंतु दिनांक २४/४/२०२४ रोजी अॅड. एम. बी. आंबेकर यांचे मार्फत दैनिक नवा मराठा मध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीस आमचे अशिलाच्या वाचनात आलेली असुन त्यात नमुद करण्यात आलेले आहे की, व सरोदे यांचे मालकीची ११.५४ चौ. मी. क्षेत्र याबाबत आमचे अशिलाचा कोणत्याही, कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्रीचा करार, मदार अथवा बोली झालेली नाही. तसेच सदर नोटीसीत मिळकतीच्या दर्शविलेल्या चर्तुसिमेत उर्वरीत १७८.२६ चौ.मी. क्षेत्राच्या चर्तुसिमा दर्शविण्यात आलेल्या आहेत त्यात पश्चिमेस चित्रा टॉकीज रोड व वाग अशा दर्शविण्यात आलेल्या आहे ती चुकीची आहे १७८.२६ चौ.मी. क्षेत्राचा वाग पुर्व बाजूने आहे असे आमचे अशिलाच्या खरेदीखतात नमुद केलेले आहे. वरील प्रमाणे आमचे अशिल यांची हरकत असे.

आमचे अशिल
विजय दत्तात्रय सरोदे
दि.२९/४/२०२४ अॅड. एस. एल. बुरके
अहमदनगर रा.पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर
मो.नं.९४०४०५२१५८

पेस्ट कंट्रोल

झुरळ,वाळवी, मुंग्या, उंदीर,कोळी,डेकुणासाठी
मो. 7276423997
9272424705

के. रेफ्रिजरेशन

कार AC, फ्रिज, डीफ्रिज, वॉशिंगमशिन व AC घरपोहच रिपेरींग करुन मिळेल
जुने फ्रिज देणे व घेणे
8275695240

जाहीर नोटीस

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर
महाराष्ट्र पुणे यांचा, मार्केट यार्ड, अहमदनगर
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये
सिंधु नागरी/ग्रामीण सेही सहकारी पतसंस्था मर्या., आहुजा वॉच विल्डींग, डाळमंडई, ता.जि.अहमदनगर
-: विरुद्ध :-

अ. क्र.	कर्जदार/जामीनदाराचे नाव	दावा क्रमांक	दावा क्रमांक
१.	श्री. घोघटनी राजकुमार पहेलुमल (कर्जदार) रा.इंदिरा कॉलनी, तारकपुर पाचवलिंगाही, तेली पंचाच्या पाठीमागे, लेलीखुंट, अ.नगर	/२०१४	१.५३.०२२/-
२.	सौ. कविता रवि नारंग (कर्जदार) बुरुडगाव रोड, शिवम बंगला, अ.नगर	/२००४	२.४५,१६९/-

सदर दावाची कागी अर्जदार यांनी सादर केलेल्या अजतीत प्रतिवादींना नोटीस पाठविण्यात आलेली आहेत, परंतु प्रतिवादी यांना नोटीस रूजू न झाल्यामुळे त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने व प्रथम सुनावनीस उपस्थित न राहिल्याने सदरची जाहीर नोटीस देत आहोत. उपरिनिर्दिष्ट अर्जावेळी आपले म्हणणे मांडण्यासाठी रजा: सातीने अथवा अधिकृत प्रतिनिधी मार्फत दिनांक ३०/०५/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रासह आपण या कार्यालयात उपस्थित रहावे.

या नोटीसीद्वारे वरील प्रतिवादींना असे कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण सुनावनीस बेळेवर हजर न राहिल्यास अथवा म्हणणे सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत आपल्या अजंची सुनावणी घेण्यात येईल व दावा सुनावलेस निर्णयीत करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच प्रथमे वरील तारखेस अगर त्यापूर्वी आपले संपूर्ण पत्ता कळविण्यास कळू केल्यास आपला बचाव पद्द समर्थपणा येईल. म्हणून आज दि. २३/०४/२०२४ रोजी कार्यालयीन मुद्रेखा हे जाहीर नोटीस देत आहे.

स्थळ – अहमदनगर
दि.२३/०४/२०२४
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था
नगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर

प्रथम पुण्यस्मरण

असा जन्म लाभावा
देहाचा चंदन व्हावा।
गंध संपला तरी
सुगंध दरवळत रहावा ।।

श्रीमती सिताबाई निकचंद बोरा
स्व.दि.२९ एप्रिल २०२३
: दुःखांकित :
डॉ.प्रदीप बी.बोरा । गविंद्र बोरा । सौ.मंगल बोरा
डॉ.जिनेश बोरा । डॉ.सौ.सोनाली बोरा राहुलजी बोरा । सौ.पुनम बोरा
राहुलजी नुद्देचा । डॉ.सौ.शितल नुद्देचा रवेशलालजी बोरा । सौ.शांता बोरा
आर्यन, आरुषी, वेदा श्रीमती सुषमा रवलकुमारजी बोरा
समस्त डॉ.गि.मु.बोरा परिवार श्रीमती उषा लक्ष्मीकांत नगरकर
माणकचंद चुनीलाल मुनोत परिवार श्रीमती सुनिता अशोक गांधी
पनवेल

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!

जाहीर नोटीस

दि.२९/०४/२०२४
अहमदनगर

दिनांक : 26 पर्यंत ते 03 मे 2024

घोस्टबुस्टर्स फ्रोझन एम्पायर	12.15 PM, 8.00 PM
सरवला	8.15 AM, 2.05 PM, 6.35 PM, 120.30 PM
बडे मियाँ छोटे मियाँ	9.00 PM
स्वातंत्र्यवीर सावरकर	10.45 AM
बु	4.00 PM
मैदान	12.30 PM
द्वे लेजेन्सी ऑफ जीनेश	9.00 AM
मॉडझीला द् कॉंग	5.40 PM
रजाकार	4.30 PM
जुन फर्निचर (मराठी)	9.20 AM, 2.45 PM, 7.30 PM, 10.15 PM

For Screen 3 All Receiver Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

जाहीर नोटीस

घ.नं./310/पिंगर/2024-25
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक- 25/04/2024

जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. बाबासाहेब रामचंद्र रासकर, धंदा-शेती व व्यापार राहणार माळखुंडी, पिंगार, अहमदनगर यांनी घर नं. 310, पिंगार सर्व्हे नं. 211-473, पिंगार अहमदनगर छावनी परिषद हे रजिस्टर खरेदीखत क्र. 1454/1996 दिनांक 09/04/1996 या आपापाच्या अपले नावावर नं./टाकत होतेच्या या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत जर कोणास कोणत्याही प्रकारे राहुल, दान, बक्षीस, खरेदी हुक्क हितसंबंध असेल, या अन्य कोणत्याही कारणाकुन हरकत व्यवस्थायी अर्धत त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसाचे आत सबळ कागदपत्रांचे पुरावासह मे. कार्यकारी अधिकारी, छावनी परिषद, अहमदनगर यांकेडचे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(शिक्का सोबत)

जाहीर नोटीस

तमाम नागरीकांस या नोटीसीद्वारे काळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळतीचे विद्यमान मालक राजेंद्र जगन्नाथ शिरसाठ व सौ. सुलिता राजेंद्र शिरसाठ रा. अहमदनगर यांनी सदर मिळकत निर्मल निजोखरी असल्याचे खाली देजन सदर मिळकतीबाबत आमचे अशिल अंबादास सुदर्शन चेंबुर व संतोष अंबादास चेबुर यांचे सोबत सौदा करुन सिरसाठ विसार घेऊन खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे. व लवकरच आमचे अशिल सदरचा खरेदी व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेचा अथवा वित्तीय संस्थेचा कोणत्याही स्वरुपाचा बोजा नसुन सदर मिळकत निर्मल, निजोखरी आहे असे विद्यमान मालकाने म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन या जाहीर नोटीसीद्वारे काळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालु वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अथवा जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेखत, मदार, मनाई हुकुम, स्थगीती, पोटगी, चार्ज, लीन, इत्यादि अगर इतर कोणताही भाव चालु असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१० दिवसांचे** आत त्यांचे या मिळकतीची असल्याचा हितसंबंधाबाबतच्या कागदोपत्री पुराव्यानिशी ॲडव्होकेट यांचेकडे या व्यवहारास लेखी हरकत नोंदवावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्मल व निजोखरी असल्याचे ग्राह्य धरुन आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची कोणतीही कोणत्याही स्वरुपाची हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

- परिशिष्ट -

मिळकतीचे वर्णन :- (१) डी. ।। सब डी. ।। व तालुके नगर पैकी नालेगांव हद्दीतील येथील सर्व्हे नं. २१५/२ प्लॉट नं. १२ चे क्षेत्र ७७.६९ चौ.मी. ही मिळकत यांची मालु/सिमा –

पुर्वेस : प्लॉट नं. १३ दक्षिणेस : सर्व्हे नं. २१५ पैकी
पश्चिमेस : प्लॉट नं. ११ उत्तरेस : ९ मी रस्ता

वेगेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत सदांमुद्दत वसुं, वहिवाट, वागणूकीचे, जागोवेगोचे हक्कासह तसेच त्यामणील असलेल्या इतर हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.

दि.२९/०४/२०२४ अॅड. राजेंद्र मोहनराव देवळालकर
अहमदनगर सुधा मोहन, बागरोळा हुडको, दिल्ली गेट, अहमदनगर
मो.नं.९८२२२८८७७०

।। द्वितीय पुण्यस्मरण ।।

स्व.विजयकुमार लक्ष्मण रामदिन
जन्म : २७-४-१९५७ । मृत्यु : २९-४-२०२२

ज्योत अनंतात विलिन झाली
स्मृती आठवणींची दाटुळ आली
भाव सुमनांची ओळ भरली
वाहतो आम्ही श्रद्धांजली...

आपल्या पावन स्मृतीस आमची भावपूर्ण श्रद्धांजली...

* दुःखांकित *
श्रीमती विमल विजयकुमार रामदिन
प्रशांत विजयकुमार रामदिन (मुलगा) । अमोल विजयकुमार रामदिन (मुलगा)
सौ.रेखा दिलीप मादास (मुलगी) । सौ.शारदा मधुकर सोमा (मुलगी)

समस्त रामदिन परिवार

बोअरची किंवा हौदावरची मोटर खराब झाली आहे!

मग वाट कसली बघताय,
आजच अभय सेल्सशी संपर्क साधा..
* स्वामीशीर काम तेही योग्य दरात

मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, नजानन हॉस्पीटल शेजारी, शास्त्रीमार्ग गल्ला, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

१५ वे पुण्यस्मरण



स्व.रामभाऊ कोंडाजी भडके (सर)
(स्व. दि. 29-4-2009)

आपल्या संस्काररूपी स्मृतींचा.. स्मृतीगंध आजही दरवळत आहे.. प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली !

दुःखांकित
ताऊजी कोंडाजी भडके
संजय रामभाऊ भडके
छायाताई नानासाहेब काळे
एकनाथ कोंडाजी भडके
सतीश रामभाऊ भडके
विद्याताई अनिल धाडगे

समस्त भडके परिवार
श्री स्वामी एन्टरप्राईजेस्
फुलसौंदर मळा, अहमदनगर.